CMYK

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | रविवार दि. ६ नोव्हेंबर २०२२ | वर्ष : २१ वे | अंक : ४० वा किंमत : ५ रुपये | पाने ८

## सांगोल्यात रेल्वे गेटखाली एसटी बस अडकली



सुराज्य/सांगोला : मिरज रेल्वे गेट खाली भुयारी मार्गातील पाण्याचा अंदाज न आल्यामुळे सांगोला आगाराची पंढरपूर -कोल्हापूर एसटी बस मध्येच अडकून राहिल्याने दोन्ही बाजूची वाहतूक खोळंबून वाहनांच्या दोन्ही बाजूला मोठ्या रांगा लागल्याने काहीकाळ गोंधळ उडाला.

दरम्यान, एसटी चालकाने अथक प्रयत्न करून पाण्यात अडकलेली बस काढल्याने खोळंबलेली वाहतूक सुरळीत झाल्याने वाहनधारकांनी सुटकेचा निःश्वास घेतला. हा प्रकार आज शनिवारी सकाळी ११:१५ च्या सुमारास घडला. दरम्यान भुयारी मार्गात गढूळ पाण्याचा अंदाज येत नसल्यामुळे असे प्रकार घडत आहेत. रेल्वे प्रशासनाने दखल घेवून भुयारी मार्गा खाली पाण्याचा बंदोबस्त करून मार्ग सुरळीत करावा अशी मागणी शहरवासीयांतून होत आहे.

# ४० विरुध्द ४०

## गद्दारांना राजकारणातून हद्दपार करण्यासाठी ठाकरेंची रणनीती

सुराज्य/सोलापूर

**जुन्या शिवसेनेतील ज्या ४० आमदारांच्या बंडामुळे राज्यातील सरकार कोसळले, शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांना मुख्यमंत्रिपदावरून पायउतार व्हावे लागले, ज्यांच्यामुळे शिवसेनेचे नाव आणि निवडणूक चिन्हसुध्दा गोठवले गेले, त्या ४० गद्दार आमदारांना राजकारणातूनच हद्दपार करण्यासाठी उध्दव ठाकरे यांनी पोलिटिकल स्ट्रॅटेजी आखली आहे. या बंडखोर आमदारांना त्यांच्याच मतदारसंघात पराभवाची धूळ चारण्याचा राजकीय डाव टाकण्यासाठी ठाकरे गटाने मोळी बांधण्याचे काम सुरू केले आहे. त्याचीच जोरदार फिल्डिंग लावण्याचे काम मातोश्रीवर सुरू झाल्याचे वृत्त समोर आले आहे.**



बंडाचा झेंडा हाती घेतल्यापासून बंडखोर गटाचे प्रमुख मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पदच्युत मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी एकमेकांच्या विरोधात शड्डू ठोकले आहेत. एकीकडे शिंदे गट प्रचंड आक्रमक झालेला असताना दुसरीकडे ठाकरे गट मात्र शांत आणि संयमी वाटचाल करताना दिसत आहे. या दोन्ही गटाचे भवितव्य न्यायालयाच्या निर्णयावर अवलंबून आहे. न्यायालयाचा निर्णय जो होईल तो होईल आणि केव्हा व्हायचा तेव्हा होईल, त्याची वाट बघत बसण्यापेक्षा बंडखोर ४० आमदारांना त्यांच्याच मतदारसंघात पराभवाची धूळ चारण्यासाठी त्यांच्या तोडीस तोड ४० उमेदवार उभे करण्याची तयार ठाकरे गटाने सुरू केली आहे. विशेष म्हणजे ठाकरे गटाने या ४० मतदारसंघांवरच आपले लक्ष्य केंद्रित केले आहे.

### बैठका, आढावा, नियोजनाचा सपाटा

आगामी सर्वच निवडणुकांमध्ये उतरण्याची जोरदार तयारी ठाकरे गटाने सुरू केली असून 'मातोश्री' वर रोजच बैठकांवर बैठका घेतल्या जात आहेत. ज्या त्या मतदारसंघातील शिवसैनिकांचे जाळे, पक्षाची यंत्रणा, मतदारसंघाच्या संपर्कात असलेले दुसऱ्या फळीतील नेते, त्यांचा जनाधार, मागील निवडणुकींमधले पक्षाला झालेले मतदान आदी सर्वच पातळ्यांवर आढावा घेऊन नियोजन करण्याचे काम ठाकरे गटाच्या टीमकडून सुरू आहे.



### विभागनिहाय नियोजन

बंडखोरी झालेल्या प्रत्येक विभागाची जबाबदारी पक्षातल्या महत्त्वाच्या नेत्यांवर सोपवण्यात येणार आहे. याआधी बंडखोर आमदार आणि पक्षातल्या कार्यकर्त्यांमध्ये किती धुसफुस होती, बंडखोर आमदाराला कोणता पदाधिकारी टक्कर देऊ शकतो, पक्षातल्या नाराज पदाधिकाऱ्यांना बंडखोर आमदारांच्या विरोधात ताकद द्यायची व त्यांना पक्षात बढती द्यायची, जेणेकरून बंडखोर आमदारांवर ते भारी पडू शकतात, असे नियोजन चालू आहे.

### कमबॅक वुईथ डॅमेज कंट्रोल

एकीकडे राज्याच्या सत्ताकारणात कमबॅक करण्याचा विडाच उचललेला असतानाच दुसरीकडे बंडखोरांना त्यांच्या मतदारसंघात थंड करून पक्षाचे डॅमेज कंट्रोल करण्यावर सध्या ठाकरेंनी लक्ष केंद्रित केले आहे. बंडखोरांच्या टीकेला उत्तर देत बसण्यापेक्षा ग्राउंडलेव्हला नियोजनबध्द काम करून पक्षबांधणी करणे आणि त्यामाध्यमातून पुन्हा सत्तेचा सोपान चढणे यावर उध्दव ठाकरे यांनी आत्तापासूनच भर देण्यास सुरुवात केली आहे.

## कार्तिकी वारीत २६ संशयितांवर प्रतिबंधक कारवाई

सुराज्य/सोलापूर : कार्तिकी वारीत २६ संशयित इसमावर पोलिसांकडून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

पंढरपूर येथे कार्तिकी वारी निमित्त भाविक येत असतात. सदर भाविकांच्या गर्दीमध्ये काही दृष्ट प्रवृत्तीचे देखील लोक सामील होऊन भाविकांचे पैसे, मोबाईल, किंमती वस्तू आदी साहित्याची चोरी करण्याच्या उद्देशाने येतात. अशा दृष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून भाविकांना त्रास होऊ नये, त्यांच्या मालमत्तेचे संरक्षण व्हावे यासाठी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर अधीक्षक हिंमत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक सुहास जगताप यांचे नेतृत्वाखाली बंदोबस्त नेमला होता. त्यांच्या पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी वेश पालटून गर्दीमधील चोरट्यांवर लक्ष देऊन वारकऱ्यांचे साहित्य उचकटणाऱ्या एकूण २६ संशयित इसमांवर सीआरपीसी कलम १०९ प्रमाणे कडक प्रतिबंधात्मक कारवाई केली आहे.

## स्थापत्य अभियंता सहाय्यकाची गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/मोहोळ : स्थापत्य अभियंता सहाय्यकाने अज्ञात कारणावरून राहत्या घरी खोलीत असलेल्या पंख्याला वायरने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शनिवारी सकाळी दहाच्या सुमारास मोहोळ येथे घडली.

सुहास रमेश काटकर (रा. विडी घरकुल, एम. एस. सी. बी. कंपौंडचे समोर, ता. उत्तर सोलापूर) हे बांधकाम विभागात सुमारे ८ वर्षापासून नोकरीस आहेत. ते सध्या स्थापत्य अभियंता सहाय्यक पदावर जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, मोहोळ येथील कार्यालयात कार्यरत होते. ते पत्नी व लहान मुलासह मोहोळ येथे वास्तव्यास होते. त्यांची पत्नी माहेरी गेली होती. . त्यामुळे घरी सुहास काटकर हे एकटेच



होते. शनिवारी सकाळी दहा वाजण्याच्या दरम्यान त्यांनी घरी खोलीत असलेल्या पंख्याला वायरच्या सहायाने गळफास घेत आत्महत्या केली. याप्रकरणी रमेश श्रीधर काटकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मोहोळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तपास पो. हे. कॉ. मालती नागरे करीत आहेत. सुहास काटकर यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, तीन विवाहित बहीण, व एक मुलगा असा परिवार आहे.

## इंग्लंडच्या विजयाने ऑस्ट्रेलिया विश्वचषकाच्या बाहेर



सुराज्य/सिडनी : इंग्लंडने बेन स्टोक्सच्या शानदार फलंदाजीच्या जोरावर श्रीलंकेवर चार विकेटने विजय मिळवत टी-२० विश्वकपच्या सेमीफायनलमध्ये प्रवेश केला. इंग्लंडच्या या विजयाने यजमान ऑस्ट्रेलिया संघ स्पर्धेच्या बाहेर फेकला गेला.

श्रीलंकेने टॉस जिंकून पहिल्यांदा फलंदाजी केली. त्यांनी २० ओव्हर्समध्ये ८ विकेटवर १४१ धावा केल्या. इंग्लंडकडून अलेक्स हेल्सने ४७ धावा, बेन स्टोक्सने ४२ आणि जोस बटलरने २८ धावा केल्या. १९ व्या षटकात इंग्लंडने हा सामना जिंकला. इंग्लंडच्या आदिल राशीद याला मॅन ऑफ द मॅच म्हणून सन्मानित करण्यात आले. ग्रुप बी मधून न्यूझिलंड आणि इंग्लंड हे दोन संघ सेमीफायनमध्ये गेले आहेत. ग्रुप ए मध्ये भारत आणि दक्षिण आफ्रिका यांचा सेमीफायनलचा प्रवेश नक्की मानला जात आहे. भारतीय संघ जर आपल्या गटात अव्वल स्थानावर राहिला तर त्यांना इंग्लंडबरोबर सेमी फायनलमध्ये दोन हात करावे लागतील. पण जर भारताचा संघ या गटात दुसऱ्या स्थानावर राहिला तर भारत आणि न्यूझीलंड यांच्यामध्ये विश्वचषकातील उपांत्य फेरीचा सामना खेळवला जाऊ शकतो.

## पार्श्वभागात यंत्राने हवा भरल्याने मुलगा गंभीर

सुराज्य/सोलापूर : एका दहा वर्षाच्या मुलाच्या पार्श्वभागात यंत्राने हवा भरून गंभीर हानी पोहोचवून लैंगिक हमला केल्याची घटना सदर बाजार परिसरात गुरुवारी दुपारच्या सुमारास घडली. या प्रकरणात पोलिसांनी डब्या ऊर्फ सागर अंजनप्पा भंडारे (वय३० रा. गुलाबनगर, मोदी) याला अटक केली. त्याला ४ दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश विशेष न्यायालयाने शनिवारी दिला.

दहा वर्षाचा अल्पवयीन मुलगा गुरुवारी दुपारी आपल्या आजीला भेटण्यासाठी जात होता. त्याच्या ओळखीतील डब्या ऊर्फ सागर भंडारे हा त्याला वाटेत भेटला आणि गोड बोलून त्याला मोदी परिसरातील एका गॅरेज मध्ये नेले. हवा भरण्याचे यंत्र चालू करून हवेचे पाईप मुलाच्या पार्श्वभागात सोडले. त्यामुळे मुलाचे पोट फुगून गंभीर हानी झाली. त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

या प्रकरणात सदर बझारच्या पोलिसांनी डब्या ऊर्फ सागर भंडारे याला शुक्रवारी अटक केली. त्याला न्यायालयाने ८ नोव्हेंबर पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश आज दिला. पुढील तपास फौजदार कांबळे करीत आहेत.

भीमा कारखाना निवडणूक

## महाडिकांना राष्ट्रवादीची साथ; विरोधकांना झटका

सुराज्य/मोहोळ

भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचा प्रचाराचा शुभारंभ वडवळ येथे नागनाथ मंदिरात नारळ फोडून व वडवळ येथे सभा घेऊन करण्यात आला. यात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते व सोलापूर जिल्हा परिषदेचे सदस्य उमेश पाटील हे भाजपचे खासदार धनंजय महाडीक यंच्यासोबत प्रचारात सक्रिय झाल्यामुळे सुरुवातीलाच धनंजय महाडीक यांनी बाजी मारल्याचे दिसून आले. हा महाडीक यांच्या विरोधकांना मोठा झटका मानला जात आहे

भीमा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक प्रक्रिया पुन्हा सुरु झाली आहे. दोन्हीकडील प्रचाराचे दोन्ही गटांनी नारळ फोडले. या निवडणुकीत धनंजय महाडीक यांच्यासोबत भाजपचे संतोष पाटील, विनोद महाडीक, विश्वराज महाडीक, पृथ्वीराज महाडीक, भीमाचे व्हा. चेअरमन सतीश जगताप, तालुकाध्यक्ष सुनील चव्हाण, संजिव खिलारे तर आहेतच परंतु राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश चिटणीस रमेश बारसकर, माजी उपसभापती मानाजी माने, राहुल क्षीरसागर ही तर मंडळी सहभागी झाली आहेत. त्याचबरोबर त्याचबरोबर काँग्रेसचे सुरेश हावळे, भिमराव वसेकर, पद्माकर देशमुख, पुळूजचे शिवाजी



शेंडगे माउली जाधव, बाबासाहेब जाधव, कुरुल जि. प. गटाच्या शैला गोडसे, शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाध्यक्ष चरण चवरे अशी दिग्गज नेते मंडळी प्रचारात सहभागी झाली आहे. हा विरोधकांना मोठा झटका मानला जात आहे. वसरत घाडगे, धनाजी भारत घाडगे, परिचारक गटाचे सुनील चव्हाण यांनी महाडीक गटात प्रवेश केला. जनहित शेतकरी संघटनेचे संस्थापक प्रभाकर भैया देशमुख यांनी ही स्टेजवर उपस्थित राहून महाडिकांना पाठिंबा दिला.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



आपण जाळलेला पुतळा कुणाचा होता ?

कल्याण

368-74-356

## अतिवृष्टीने २ लाख २७ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान

- अद्याप पंचनामे नाहीत
- शेतकरी नुकसान भरपाईपासून वंचित

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्यात ऑगस्ट सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील २ लाख १७ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. माढा आणि मंगळवेढा तालुक्याला मोठा फटका बसला आहे. नुकसानीचे पंचनामे चालू असून अद्याप पूर्ण झाले नाहीत त्यामुळे शेतकरी राजा नुकसान भरपाई पासून वंचित राहिला आहे. दोन दिवसात पंचनामे पूर्ण झाल्यानंतर नुकसान भरपाईचा अहवाल शासनाला सादर केला जाईल, अशी माहिती जिल्हा कृषिअधिकारी बाळासाहेब शिंदे यांनी दिली.

यंदाच्या वर्षी परतीच्या पावसाने सोलापूर जिल्ह्याला झोडपून काढले. जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यात



अतिवृष्टी झाली. यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक वाहून गेले. यामध्ये खरीपमधील मूग उडीद, सोयाबीन या पिकांबरोबरच द्राक्षे कांदा याला मोठा फटका बसला शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठले होते. जिल्ह्यातील सर्व तालुक्यांना चांगलाच फटका बसला आहे. सर्वाधिक फटका हा दक्षिण सोलापूर, बार्शी, उत्तर सोलापूर, अक्कलकोट, माढा, करमाळा, मंगळवेढा, सांगोला, माळशिरस या तालुक्यांना बसला आहे. अक्कलकोट, बार्शी, उत्तर सोलापूर आणि दक्षिण सोलापूर तालुक्यांना चारवेळा फटका बसला आहे. दोन लाख ३२ हजार २४३ शेतकऱ्यांच्या एक लाख ८२ हजार ५८३ हेक्टर शेती पिकांना फटका बसला आहे. १४७ कोटी ६० लाख रुपयांची मदत मिळाली आहे पहिल्या टप्यातील वाटप झाले आहे तर दुसऱ्या टप्प्यातील १०७ कोटींचे वाटप आणखीन सुरूच आहे. तर ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीचे पंचनामे चालू आहेत.

### ऑगस्ट ते ऑक्टोबर तीन महिन्यात झाले नुकसान

✻ उत्तर सोलापूर, बार्शी, दक्षिण, अक्कलकोट तालुक्यातील २८,०६६ शेतकऱ्यांचे २५९९९ हेक्टर बाधित झाले आहे. यासाठी ४०.५८ कोटीची निधी मिळला आहे. ✻ बार्शी, दक्षिण सोलापूर, मंद्रूप व अक्कलकोट तालुक्यातील १३,८६४ शेतकऱ्यांचे ७४ हजार ४४६ हेक्टरक्षेत्र बाधित झाले होते त्यासाठी १०७ कोटीचा निधी प्राप्त झाला होता. ✻ उत्तर सोलापूर मंद्रूप अक्कलकोट तालुक्यातील २६ हजार १४२ शेतकऱ्यांचे २३ हजार ८६७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले होते. यासाठी ३६ कोटीचा निधी मिळाला आहे. ✻ माढा तालुक्यातील पाच गावे, करमाळा ८ गावे, सांगोला, दक्षिण सोलापूर -२ गावे मंगळवेढा ८ गावे, सांगोला १ अशा १९ गावातील ४४,४४७, शेतकऱ्यांचे ४६,२०४ क्षेत्र बाधित झाले आहे.

### पंचनामे करण्याचे काम अंतिम टप्प्यात

शेवटच्या अतिवृष्टीमध्ये मोठा फटाका शेतकऱ्यांना बसला आहे. त्यामुळे पंचनामे करण्यास वेळ लागत आहे. पंचनामे करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. दोन दिवसात पंचनामे पूर्ण होईल जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून नुकसानीचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला जाईल

– बाळासाहेब शिंदे (जिल्हा कृषीअधिकारी)

# ‘भाजप अनुसूचित मोर्चामुळे दक्षिणमध्ये आमदार कल्याणशेट्टी यांना पाठबळ’

सुराज्य/अक्कलकोट

**दक्षिण सोलापूर तालुक्यात भाजप अनुसूचित जाती मोर्चा राबवत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमामुळे व सुनियोजित संघटनामुळे भाजपा जिल्हा अध्यक्ष आमदार सचिन ल्याणशेट्टी यांची ताकद वाढत असून पक्षाला मोठा फायदा होत असल्याच प्रतिपादन दक्षिण सोलापूरचे महेश बिराजदार यांनी केले.**

भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी व भाजपा नेते मनीष देशमुख यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आचेगाव येथे भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती जमाती सेल तालुका अध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली आयोजित रक्तदान शिबिर व विविध उपक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आयुष्यमान भारत योजना व वस्तीसंपर्क अभियान, वृक्षारोपण करण्यात आले. रक्तदान शिबिराचे उद्घाटन नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले.



अध्यक्षस्थानी भाजपा तालुकाध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी हे होते. यावेळी भाजपा अनु. जाती तालुकाध्यक्ष बलवान गोतसुर्वे,आचेगावचे सरपंच रमेश क्षीरसागर, एपीआय रमेश बिराजदार, राजकुमार बाईटपल्ली, तंटामुक्त अध्यक्ष भगवान गोतसुर्वे, होटगी सरपंच अतुल गायकवाड, माजी उपसरपंच हरून बिराजदार, माजी एपीआय दत्ता पाटील, ज्ञानेश्वर सोनकांबळे, सतीश कदम, सिद्धार्थ सोशल फाउंडेशनचे अध्यक्ष व गोगावचे उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, अक्कलकोट भाजपा अनुसूचित जाती अध्यक्ष निजाप्पा गायकवाड, भाजपा नेते धोंडीराज बनसोडे, आरपीआय शाखाध्यक्ष संजय गोतसुर्वे, अमोगसिद्ध पाटील, प्राथमिक आरोग्य केंद्राचे शिवाजी जाधव, विकास गोतसुर्वे, हुसेन पटेल महेबूब पटेल, शिलीसिद्ध कोळी आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम थोर समाजसेवक कै. आप्पाराव सिद्राम गोतसुर्वे पुण्यस्मरण दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक संजय गोतसुर्वे यांनी केले. यावेळी विकास गोतसुर्वे, गौतम बाळशंकर, अतुल गायकवाड यांची भाषण झाली. कार्यक्रमासाठी शरद गोतसुर्वे, उत्तरेश्वर गोतसुर्वे, यशवंत सुर्वे, काशिनाथ सुर्वे, भारत सोनकांबळे, अरुण थोरात, सुरेश मोची, कुलदीप पाटील, रायपा जळगोडर, अविनाश घटकांबळे जयंती मंडळ अध्यक्ष आकाश सुर्वे, जयवर्धन शिंदे, संदेश घटकांबळे यांच्यासह आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे यांनी केले तर आभार कार्यक्रमाचे संयोजक व भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती सेलचे दक्षिण तालुका अध्यक्ष बलवान गोतसुर्वे यांनी मानले.



## कृषीभूषण अंकुश पडवळे यांना ‘राष्ट्रीय कृषी पुरस्कार’ प्रदान

### शेती व फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय काम

सुराज्य/मंगळवेढा : मंगळवेढा तालुक्यातील खुपसंगी गावचे कृषीभूषण पुरस्कारप्राप्त प्रयोगशील शेतकरी अंकुश पडवळे यांना केंद्रीय कृषी व किसान कल्याण मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत येणाऱ्या राष्ट्रीय बागवानी बोर्डाच्यावतीने राष्ट्रीय स्तरावरील शेती व फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याबद्दल राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांच्या हस्ते पुणे येथील विशेष कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.

पुणे येथील वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्थेत केंद्रीय कृषी मंत्रालयाच्यावतीने कृषी व फलोत्पादन क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या शेतकरी, संस्थांचा सन्मान व राष्ट्रीय कृषी मूल्यवर्धन साखळी वाढविणे, विस्तार व संधी याबाबतच्या कार्यशाळेत पडवळे यांना वरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी कृषीमंत्री अब्दुल सत्तार, फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे, केंद्रीय कृषिसचिव मनोज आहुजा, केंद्रीय अतिरिक्त कृषी सचिव डॉ. अभिलेक्ष लेखा, प्रधान सचिव एकनाथ डवले, केंद्रीय कृषी उपसाचिव प्रियरंजन राज, कृषि आयुक्त धीरजकुमार उपस्थित होते. पडवळे यांच्या कामाची दखल घेऊन महाराष्ट्र शासनानेही कृषीभूषण पुरस्काराने यापूर्वीच त्यांना सन्मानित केले आहे. तसेच स्वयंसेवी संस्था व निमशासकीय संस्थानीही त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना २५ पेक्षा जास्त पुरस्कार दिलेले आहेत.

## वाहनाच्या धडकेत वृद्ध महिला जखमी

सुराज्य/सोलापूर

वाहनाच्या धडकेत वृद्ध महिला जखमी झाल्याची घटना दि. २ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान होटगी रोडवरील टाटा मोटर्स समोर घडली.



याप्रकरणी उषा सत्येश्वर पाटील (वय-६७, रा. काडादी नगर, होटगी रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून शिवपुत्र बसण्णा सिंदगी (रा. मु. पो. आहेरवाडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी या त्यांच्या दुचाकी क्रमांक एम.एच.१३. डीके.९३६३ वरून विठ्ठल मंदिरात होटगी रोड वरून जात होते.त्यावेळी एका वाहन चालकाने भरधाव वेगाने व बेकायदेशीरित्या वाहन चालून फिर्यादी यांना पाठीमागून जोऱ्याने धडक देऊन जखमी केले आहे. पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल बहिर्जे हे करीत आहेत.

## मयताच्या वारसांना अनुकंपा सेवेत सामावून घेण्याची मागणी

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद सेवेत असताना मयत झालेल्या कर्मचारी व शिक्षकांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर सेवेत सामावून घेऊन तात्काळ नेमणुकीचे आदेश देण्यात यावीत, अशी मागणी सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाच्या गुरूसेवा परिवाराच्यावतीने जिल्हा परिषद सामान्य प्रशासनाकडे एका निवेदनाद्वारे केली असल्याचे पत्रक विरभद्र यादवाड यांनी प्रसिध्दीस दिली आहे.



मयत कर्मचाऱ्यांच्या व शिक्षकांच्या वारसांना अनुकंपा नोकरी देण्यासंबधी पात्र वारसाचे कागदपत्रे पडताळणी होऊन तीन महिने होऊनही अद्यापपर्यंत नेमणुकीचे आदेश दिली जात नाही म्हणून सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष वीरभद्र यादवाड महिबूब सवार दामोदर सुतार एस. एस. बिराजदार चिवडशेट्टी व इतर पदाधिकारी आज जिल्हा परिषद सामान्य प्रशासन विभागाचे अधीक्षक अनिल जगताप यांची भेट घेऊन तात्काळ नेमणूकीचे आदेश द्यावीत अन्यथा आमरण उपोषण करण्याचा निवेदन सादर केली. यावेळी जगताप यांनी पुढील आठवड्यात पात्र वारसदारांना नेमणुकीचे आदेश देण्यात येईल, असे सांगितले.

## दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर : रेल्वे स्टेडियमजवळ पार्क करून ठेवलेली दुचाकी क्रमांक एम.एच.१३.सी.वाय.२४६४ ही अज्ञात चोरट्याने डुप्लिकेट चावीचा वापर करीत हँडल लॉक तोडून चोरून नेली आहे. ही घटना दि. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी सहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी भगवान रामअधार दास (वय-४६, रा. रेल्वे कॉर्नर, पोटर चाळ) यांनी सदर बाजार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल आटुळे हे करीत आहेत.

## फडणवीस बसवप्रेमींची कुचेष्टा करीत आहेत

### लिंगायत ईंगा दाखवणार; स्मारक कृती समितीचे अध्यक्ष बगले यांचा इशारा

सुराज्य/सोलापूर

**मंगळवेढ्यातील महात्मा बसवेश्वर स्मारकाचा प्रश्न भाजपा सरकारने सोडवला आहे, असे वक्तव्य करून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपचा खोटारडेपणा पुन्हा एकदा सिद्ध करून बसवप्रेमींची कुचेष्टा केली आहे.असा आरोप महात्मा बसवेश्वर स्मारक कृती समितीचे अध्यक्ष डॉ. बसवराज बगले यांनी केला आहे.**





मागील सरकारच्या काळात देवेंद्र फडणवीस यांनीच पुढाकार घेऊन महात्मा बसवेश्वर स्मारक निर्मितीकार्य हाती घेऊन समितीची स्थापना केली होती. मात्र, भाजपातील स्थानिक लोकप्रतिनिधींनी याबाबतचा अभ्यासपूर्वक पाठपुरावा न केल्याने हा विषय प्रलंबित होता. नंतरच्या महाविकास आघाडीच्या कारकिर्दीत राष्ट्रवादीचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शासकीय समितीची स्थापना झाल्यानंतर फक्त पंधरा दिवसात आम्ही जागेचा विषय हाताळला मात्र सत्ताबदल झाल्याने हा विषय पुन्हा रेंगाळला आहे.

मंगळवेढ्यातील नंदूर येथे उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी तथ्यहीन आणि खोटे बोलून लिंगायत समाजाच्या भावनेची कुचेष्टा केली आहे. सरकारी जागा अद्याप बसवेश्वर स्मारक समितीकडे वर्ग झालेलाच नसताना भाजपने जागेचा प्रश्न सोडवला आहे, अशी थाप मारली आहे. या त्यांच्या वक्तव्याचा राज्यातील सर्व बसवप्रेमींकडून निषेध केला जात आहे.

**लिंगाचा ईंगा दाखवणार...!**

संपूर्ण लिंगायत समाजाने बसवेश्वर स्मारकाच्या अपेक्षा ठेवून माजी आ. प्रशांत परिचारक यांचे शब्द मानून मंगळवेढ्यातील भाजपाचे उमेदवार आ. समाधान आवताडे यांना साथ दिली आहे. याची जाणीव असेल तर येत्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीपूर्वी स्मारकासाठी जागा देऊन मंगळवेढ्यात स्मारकाचे भूमिपूजन करावे अन्यथा लिंगायत समाज बांधव सत्ताधारी पक्षाला जागा दाखवेल, असा इशारा बगले यांनी दिला आहे.

**१५१ कोटींचा आराखडा कुठे?**

महात्मा बसवेश्वर स्मारकासाठी सरकारी जागा देऊन हा प्रश्न सोडविलेला आहे, असे बोलणाऱ्यांनी त्याबाबतचे एक तरी कागद दाखवावे आणि समितीच्या नावाने जागा वर्ग झालेला उतारा दाखवावा. याशिवाय १५१ कोटींचा आराखडा कोणत्या जमिनीवर केलाय की चंद्रावर केलाय याचा पुरावा द्यावा, असे आव्हान स्मारक समितीच्यावतीने दिले आहे.

## तीनशे किलो भेसळयुक्त पेढा नष्ट

### अन्न व औषध प्रशासनाची कारवाई; १० जणांवर गुन्हा

सुराज्य/पंढरपूर

**कार्तिक वारीमध्ये अन्न व औषध प्रशासन विभागाने ७२ हजार रुपये किंमतीचा भेसळयुक्त पेढा पंढरपूर शहरात केला नष्ट करत तब्बल १० आरोपींविरुद्ध केला गुन्हा दाखल केला आहे.**



पंढरपूर शहरात कार्तिकवारी अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाने अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर, उमेश भुसे, नमुना सहाय्यक श्रीशैल हिटनल्ली यांनी गोपनीय माहिती आधारे काळा पंढरपुरातील मारुती चौकातील हिम्मत गणू चौगुले, बाबू दादा माने (राहणार कवठे महांकाळ ) यांनी विक्रीस आणलेल्या पेढ्याचा संशय आल्याने सदर पेढ्यात जागेवर आयोडीन टाकून पाहिले असता सदर पेढ्यात स्टार्च या अन्नपदार्थाची भेसळ असल्याचे आढळून आले. त्यामुळे सदर भेसळयुक्त ३०० किलो पेढा जप्त केला आणि सदर पेढा भेसळयुक्त असल्याने जागेवर नष्ट करण्यात आला. सदर मालाची किमंत ७२ हजार रूपये आहे.

या प्रकरणात भादंवी कलम २७२, ३४ नुसार एकूण १० आरोपीविरुद्ध गुन्हा पंढरपूर शहर पोलिस स्टेशन दाखल करण्यात आला आहे. यातील आठ आरोपी फरार आहेत. सदरची कारवाई सहाय्यक आयुक्त (अन्न) प्रदिपकुमार राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी प्रशांत कुचेकर, यु. एस. भुसे, व नमुना सहाय्यक श्रीशैल हिटनल्ली यांच्या पथकाने पूर्ण केली.

## राशीभविष्य

### दि. ०६ नोव्हेंबर ते १२ नोव्हेंबर २०२२

**मेष**

या आठवड्यात केलेला व्यावसायिक प्रवास शुभ परिणाम आणेल आणि तुम्ही जिथे जाण्यासाठी बराच वेळ वाट पाहत होता परंतु जाऊ शकले नाही अशा ठिकाणी प्रवास करू शकतात. तब्येतीत बरीच सुधारणा होईल आणि तुम्हांला बरे वाटेल. कुटुंबात नवीन सुरुवात केल्याने जीवनात शांतता राहील. या आठवड्यात खर्च जास्त असू शकतो. यावेळी वडिलधाऱ्यांचा सल्ला तुम्हांला विपरीत परिणाम देऊ शकतो. या आठवड्यात कामाच्या ठिकाणीही प्रतिकूल बातम्या मिळण्याची शक्यता आहे आणि याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

**शुभ दिवस : ८,१०,११**

**वृषभ**

या आठवड्यात तुम्ही केलेल्या व्यावसायिक प्रवासामुळे यशाचा मार्ग मोकळा होईल आणि प्रवास यशस्वी करण्यासाठी तुम्हांला अचानक कोणाची तरी मदत मिळू शकेल. आर्थिक बाबतीत अनावश्यक वादविवाद टाळल्यास चांगले परिणाम दिसून येतील. या आठवड्यात कामाच्या ठिकाणीही काही त्रास होऊ शकतो आणि तुमच्या प्रकल्पातील स्त्रीमुळे अस्वस्थताही वाढू शकते. तब्येतीत सुधारणा होईल. आठवड्याच्या शेवटी एक नवीन सुरुवात तुमच्या जीवनात सुख समृद्धी आणेल.

**शुभ दिवस : १०,११**

**मिथुन**

या आठवड्यात तुम्ही तुमच्या आरोग्याबाबत खूप जागरूक असाल आणि तुम्हांला तंदुरुस्त वाटेल. व्यावसायिक प्रवासामधूनही यश मिळेल आणि या आठवड्यात तुमच्यासाठी प्रवासाचे अनेक योगायोग घडतील. या आठवड्यात तुम्ही आर्थिक बाबतीत केलेल्या मेहनतीचे भविष्यात चांगले परिणाम मिळतील. कामाच्या ठिकाणी कठीण काळ येईल आणि तुम्हांला प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो. कुटुंबात काही बाबींवर परस्पर मतभेद निर्माण होऊ शकतात आणि संवादाने प्रकरणे सोडवल्यास चांगले परिणाम दिसून येतील. काही धार्मिक कार्यात सामील होण्याचा निर्णय घेऊ शकता.

**शुभ दिवस : ७,८,१०,१२**

**कर्क**

आर्थिक दृष्टीकोनातून वेळ अनुकूल आहे आणि आर्थिक लाभासाठी या आठवड्यात मजबूत परिस्थिती निर्माण होत आहे. हा सल्ला तुम्हाला संपत्ती वाढवण्यासाठी उपयोगी पडेल आणि कोणीतरी पुढे येऊन तुम्हाला मदत करू शकेल. कामाच्या ठिकाणी संतुलन निर्माण करून पुढे गेल्यास चांगले परिणाम दिसून येतील. या आठवड्यात तब्येतीत बरीच सुधारणा होईल आणि या आठवड्यात सुरू झालेली कोणतीही आरोग्य कृती तुमच्यासाठी शुभ परिणाम देईल. कुटुंबातील तरुण व्यक्तिकडून चांगली बातमी मिळू शकते.

**शुभ दिवस: ७,८,९,१२**

**सिंह**

कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि कठोर परिश्रम करून पद मिळविलेल्या व्यक्तींची मदत मिळेल. आर्थिक बाबींमध्ये तुम्हाला दिलेली आश्वासने या आठवड्यात पूर्ण होताना दिसत नाहीत आणि तुम्ही बॅकअप योजना घेऊन पुढे गेल्यास ते चांगले होईल. आरोग्याबाबत नवीन विचार करून तुम्ही तुमच्या आरोग्यविषयक क्रियाकलापांकडे लक्ष दिल्यास चांगले परिणाम दिसून येतील आणि तुम्हाला बरे वाटेल. कुटुंबात एखाद्या गोष्टीची चिंता अधिक राहील आणि झोपेचा त्रास होईल. आठवड्याच्या शेवटी, आपण भविष्याभिमुख असाल आणि आपल्या प्रियजनांच्या चांगल्या भविष्यासाठी काही ठोस निर्णय देखील घेऊ शकता. **शुभ दिवस: ७, ८,११**

**कन्या**

कुटुंबात सुख समृद्धी असेल आणि तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या सहवासात आनंददायी वेळ घालवाल. या आठवड्यात केलेला व्यावसायिक प्रवास देखील चांगली बातमी घेऊन येईल आणि प्रवास यशस्वी होईल. प्रवासादरम्यान, उज्वल व्यक्तिमत्त्व असलेल्या व्यक्तीकडून तुम्हाला मदत होईल. आरोग्यात बरीच सुधारणा होईल आणि उर्जा आणि फिटनेस राहील. जर तुम्ही कोणाशीही मिळून आरोग्यविषयक उपक्रम केलात तर तुम्हाला त्यात अधिक यश मिळेल. या आठवड्यात कामाच्या ठिकाणी अडचणी वाढू शकतात. आर्थिक बाबींमध्येही महिला वर्गावर जास्त खर्च होताना दिसतो. आठवड्याच्या शेवटी साधारण यशस्वी जीवनाचा लाभ मिळेल.

**शुभ दिवस: ८,९,१०,१२**

**तूळ**

कुटुंबात आनंद आणि सौहार्द कायम राहील आणि मुलाकडून आनंददायी बातमीही मिळू शकते. जेव्हा तुम्ही स्वतःवर विश्वास ठेवता आणि निर्णय घ्याल आणि त्यांचे पालन कराल तेव्हाच तुम्ही व्यवसायाच्या प्रवासामध्ये यशस्वी व्हाल. या आठवड्यात खर्च जास्त राहतील आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे तुम्हाला कठीण जाईल. या आठवड्यात कामाच्या ठिकाणी कोणताही नवीन प्रकल्प करण्यात अडचणी येऊ शकतात. आठवड्याच्या शेवटी, आपण भविष्यासाठी योजना करू शकता.

**शुभ दिवस: ८,९,१२**

**वृश्चिक**

कार्यक्षेत्रात प्रगती होईल आणि तुमच्या प्रकल्पाशी संबंधित व्यावसायिक प्रवास देखील या आठवड्यात तुमच्यासाठी शुभ परिणाम देतील. कुटुंबाच्या सहवासात तुम्ही खूप आनंदी असाल आणि त्यांच्यासोबत वेळ घालवायला आवडेल. प्रवासाला जाण्यापूर्वी थोडे वास्तववादी असणे आवश्यक आहे, तरच तुम्हाला सुख समृद्धी मिळेल. खर्च जास्त असेल आणि स्त्रीवर जास्त खर्च होऊ शकतो. आरोग्याकडेही लक्ष देण्याची गरज आहे, अन्यथा स्नायू दुखी वाढू शकते. सप्ताहाच्या शेवटी स्त्रीच्या सहकार्याने जीवनात शांतता राहील.

**शुभ दिवस : ७,१०,१२**

**धनु**

या आठवड्यात तुमच्या कुटुंबाकडून चांगली बातमी मिळेल आणि नवीन सुरुवात तुमच्या जीवनात शांतता आणेल. आर्थिक बाबतीत हळूहळू वेळ अनुकूल होईल आणि आर्थिक लाभ होईल. कामाच्या ठिकाणी आठवड्याच्या उत्तरार्धात तुमच्यासाठी अचानक अनुकूल परिस्थिती निर्माण होईल आणि यश मिळेल. आरोग्याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आपण एखाद्याच्या आरोग्याबद्दल अधिक काळजी करू शकता. आठवड्याच्या शेवटी तुम्ही निष्काळजी न राहिल्यास चांगले परिणाम दिसून येतील. या आठवड्यात व्यावसायिक प्रवास पुढे ढकलणे तुमच्यासाठी चांगले राहील. **शुभ दिवस: ९,१०,१२**

**मकर**

आर्थिक बाबींसाठी हा आठवडा अनुकूल असून आर्थिक लाभ होईल. तुमच्या अपेक्षेपेक्षा कमी असले तरी कार्यक्षेत्रात अचानक काही यश मिळू शकते. एखाद्या व्यक्तीसोबत मिळून केलेल्या आरोग्यविषयक क्रियाकलापांमुळे या आठवड्यात तुम्हांला खूप चांगली बातमी मिळू शकते आणि तुम्हांला खूप तंदुरुस्त वाटेल. कुटुंबात आनंद आणि सौहार्द राहील आणि तुमच्या कुटुंबाच्या सुंदर भविष्यासाठी तुम्ही या आठवड्यात काही निर्णय घेऊ शकता. **शुभ दिवस : ७, ८, ९**

**कुंभ**

या आठवड्यात केलेल्या व्यवसायासंबंधी प्रवास तुमच्यासाठी शुभ संदेश घेऊन येईल आणि तुम्हाला या संदर्भात एखाद्याची मदत देखील मिळू शकेल. आर्थिक बाबतीत वेळ अनुकूल आहे आणि आर्थिक लाभ होईल परंतु ते तुमच्या अपेक्षेपेक्षा कमी असू शकतात. कामाच्या ठिकाणी तुम्हाला दिलेली आश्वासने या आठवड्यात पूर्ण होताना दिसत नाहीत आणि विलंब होईल. दुसऱ्या योजनेसह तुमचा प्रकल्प यशस्वी करण्याचा प्रयत्न केल्यास तुमच्या प्रगतीचा मार्ग मोकळा होईल. या आठवड्यात तुम्ही केलेले कष्ट भविष्यात तुमच्या जीवनात समृद्धी आणतील. आठवड्याच्या शेवटी काही नुकसान होऊ शकते. **शुभ दिवस : ७, ८,१०**

**मीन**

हा आठवडा तुमच्या कामाच्या ठिकाणी चांगला आहे आणि तुम्हांला तुमच्या प्रकल्पात सहज यश मिळेल. आर्थिक बाबतीत काही नुकसान होऊ शकते. कौटुंबिक बाबींमध्येही तुम्हाला काही बंधने वाटू शकतात. या आठवड्यात व्यावसायिक प्रवास पुढे ढकलल्यास चांगले होईल. आजार किंवा ताप इ. वृद्ध व्यक्तीच्या तब्येतीचीही तुम्हांला अधिक काळजी वाटेल. आठवड्याच्या शेवटी तुम्ही थोड्या पार्टी मूडमध्ये असाल आणि नवीन मित्र बनवाल आणि मन प्रसन्न राहील.

**शुभ दिवस: ९,१०,१२**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R.N.I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail.com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

# परिचारक, पाटील यांच्या अनुपस्थितीतच फुटला 'भीमा बचाव'च्या प्रचाराचा नारळ

## नेतृत्वाविना प्रचार सुरू झाल्याने सभासदांमध्ये कुजबुज वाढली

सुराज्य/विरवडे (बु.)

मोहोळ तालुक्यातील भीमा सह साखर कारखान्याच्या निवडणूक प्रचारचा नारळ दोन्ही गटाकडून फोडण्यात आला.

खा. धनंजय महाडिक यांच्या भीमा परिसर विकास आघाडीला फाईट देण्यासाठी परिचारक-पाटील गटाकडून भीमा बचाव संघर्ष समितीची स्थापना करत ओढून ताणून पॅनल तयार करण्यात आला. निवडणूक प्रक्रिया सुरु झाल्यापासून ते अर्ज मागारी घेण्याच्या शेवटच्या मुदतीपर्यंत कोणत्याही प्रक्रियेत माजी आमदार प्रशांत परिचारक व माजी आमदार राजन पाटील यांनी कसलाच सहभाग नोंदविला नाही. त्यामुळे सभासदांची उत्कंठा शिगेला ताणली होती. दरम्यान भीमा बचाव संघर्ष आघाडीने मोहोळ तालुक्यातील वडवळ येथील श्री क्षेत्र नागनाथ मंदिरात श्रीफळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ केला खरा मात्र या प्रचार सभेला प्रशांत परिचारक व राजन पाटील आले नसल्याने तर्क वितरकांना उधान आले असून अनेक सभासद





संभ्रमात तर काही चिंतेत गेले आहेत.

मोहोळ तालुक्यातील टाकळी सिकंदर येथील भीमा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचे रणसंग्राम आजपासून खऱ्या अर्थाने सुरू झाले आहे. गेल्या अनेक दिवसापासून भीमा परिवाराकडून विश्वराज महाडिक यांनी गाव भेट दौरा करून भीमा परिसर पिंजून काढला. शिवाय गेल्या आठवडाभरापासून खा. धनंजय महाडिक यांनी देखील दौऱ्याला सुरुवात केली. मात्र अधिकृतरित्या आज पासून खऱ्या अर्थाने प्रचाराला सुरुवात झाली असून आज पहिल्याच दिवशी भीमा बचाव संघर्ष समितीने वडवळ येथील श्री क्षेत्र नागनाथ मंदिर येथे प्रचाराचा शुभारंभ केला. गेल्या दोन दिवसापासून या प्रचार सभेच्या पोस्टर मध्ये प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार प्रशांत परिचारक व माजी आमदार राजन पाटील यांचा नामोल्लेख केला होता. त्यामुळे आजच्या सभेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. मात्र या सभेला परिचारक व पाटील हे दोन्ही माजी आमदार उपस्थित राहू शकले नाहीत. गेल्या अनेक दिवसापासून खा. महाडिक यांना विरोध करायचा म्हणून कोणत्याही परिस्थितीत पॅनल उभा करायचा असा निश्चय करणारे दिलीप घाडगे, कल्याणराव पाटील यांनी प्रचार सभेची धुरा बाळराजे पाटील व अजिंक्यराणा पाटील यांच्या खांद्यावर दिली आहे.

### परिचारक व राजन पाटलांचे दुर्लक्ष

प्रचाराच्या निमित्ताने या सर्वांनी आरोप प्रत्यारोपाच्या फैरी भीमा परिवारावर झाडल्या असल्या तरी भीमा बचाव संघर्ष समितीकडून भीमा परिवारावर टीका करण्यासाठी एकही ठोस मुद्दा नसल्याचे बोलले जात आहे. त्यामुळेच कदाचित पाटील व परिचारक कुटुंब प्रमुखातील प्रमुख असणाऱ्या प्रशांत परिचारक व राजन पाटील यांनी निवडणुकीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचे सभासद व शेतकऱ्यांमधून बोलले जात आहे.

# कामगार, शेतकऱ्यांच्या हितासाठी कारखान्याची निर्मिती आवश्यक : फडणवीस

## आवताडे शुगरच्या प्रथम गळित हंगामाचा शुभारंभ उत्साहात



सुराज्य/मंगळवेढा

कामगार, शेतकऱ्यांचे हीत साधायचे असेलतर अर्थ तंत्र चक्र फिरल्यास सामान्य दिवस बदलतात. यासाठी साखर कारखान्याची निर्मिती आवश्यक आहे. कारखानदारी केवळ नफा मिळवण्यासाठी नाही तर तालुक्यातील लोकांना रोजगार मिळावा व शेतकऱ्यांना या कारखान्याचा फायदा व्हावा या दृष्टिकोनातून आवताडे यांनी चांगले पाऊल उचलले आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते मंगळवेढा आवताडे शुगर च्या प्रथम गळित शुभारंभ व शेतकरी मेळाव्यात नंदूर येथे बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील होते.

या कार्यक्रमास व्यासपीठावर खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर खा. जय सिद्धेश्वर महास्वामी आमदार सचिन कल्याणशेट्टी आ. सुभाष देशमुख आ. शहाजीबापू पाटील आ. रणजीतसिंह मोहिते -पाटील आ. राम सातपुते माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार प्रशांत परिचारक, कारखान्याचे चेअरमन संजय आवताडे उपस्थित होते.

फडणवीस पुढे म्हणाले की, मागील काळात कारखानदारी जगवली पाहिजे यासाठी एफ आर पी ची रक्कम जवळपास दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज आम्ही दिले होते. आधारभूत किमती ची तरतूद गेली४० वर्षापासून आहे परंतु यापूर्वीच्या सरकारने स्वतःच्या फायद्यासाठी उसाची आधारभूत किंमत ठरवली नाही. माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी किंमत ठरवून दिली. त्याचबरोबर इथेनॉल निर्मितीलाही चालना देण्याचे काम केले. सध्या इथेनॉलचे भाव वाढत आहेत त्यामुळे कारखान्यांना एफ आर पी देणे सोयीचे झाले आहे.

मंगळवेढा २४ गावच्या उपसा सिंचन योजनेला मान्यता मिळालेली आहे. परंतु २०१७-१८ चे दर सूची असल्याने निविदा काढता येत नाहीत लवकरच नियोजन समिती नवीन दराप्रमाणे योजना तयार करून लवकरच मार्गी लागेल

मंगळवेढा मध्ये महात्मा बसवेश्वराच्या स्मारकासाठी १५१ कोटी रुपयांचा प्रस्ताव आम्ही आणला होता परंतु मागील सरकारने त्याला काहीही प्रतिसाद दिला नाही. आम्ही मात्र येत्या काही काळात महात्मा बसवेश्वराचे आंतरराष्ट्रीय स्मारक व श्री संत चोखामेळा यांच्या स्मारकासाठी निधीची तरतूद करून केलेल्या कामाच्या भरोशावरच लोकांपर्यंत मत मागायला जाऊ. पंढरपूर ते फलटण रेल्वे मार्गासाठी खासदार निंबाळकर व आमची आग्रहाची भूमिका घेतली असून यासाठी लागणारा निधीचा वाटा केंद्र सरकार बरोबर महाराष्ट्र सरकार देणार आहे.

यावेळी राधाकृष्ण विखे-पाटील यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी कुर्मादास चटके मुख्य कार्यकारी अधिकारी मोहन पिसे कार्यकारी संचालक तसेच कर्मचारी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते शेवटी उपस्थितांचे आभार ड. बापू मेटकरी यांनी मांडले.

### मंगळवेढ्याचा विकासासाठी भरघोस तरतूद : आ. आवताडे

आ. समाधान आवताडे म्हणाले की, पंढरपूरच्या विकासाबरोबरच मंगळवेढ्याचा विकासासाठी भरघोस तरतूद उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी केली आहे. पंढरपुरात तीनशे कोटीचा प्रकल्प उभारण्यासाठी लवकरच निधी उपलब्ध होईल. ७० ते ८० कोटी रुपये आजपर्यंत या दोन्ही तालुक्याला तीन महिन्यात दिले आहेत. २४ गावाच्या उपसा सिंचन योजनेबद्दल लवकरच निधी मिळावा त्याचबरोबर महात्मा बसवेश्वर आंतरराष्ट्रीय स्मारक, श्री संत चोखामेळा स्मारक, भीमा नदीच्या पात्रातील बॅरेगेजेस, निंबोणी, गादेगाव ग्रामीण रुग्णालय तर मंगळवेढा येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा मिळावा, अतिवृष्टी मध्ये फळबागांचा समावेश करावा, पौट साठवण तलाव पंढरपुर तीर्थक्षेत्र विकास, माण नदीला कॅनॉलचा दर्जा, आदि मागण्या यावेळी मांडल्या.



दाजीपेठेतील श्री व्यंकटेश्वर देवस्थामध्ये ५० व्या ब्रह्मोत्सवानिमित्त गरुड वाहन सेवा करण्यात आली होती.

# देगलूरकर महाराज यांचे ८ पासून सोलापुरात प्रवचन

सुराज्य/सोलापूर : श्रीराम कृष्ण सेवा प्रतिष्ठानच्या विद्यमाने येत्या मंगळवारी ८ नोव्हेंबर ते गुरुवार १० नोव्हेंबर दरम्यान रोज सायंकाळी सहा ते आठ या वेळेत हुतात्मा स्मृती मंदिर येथे ज्ञानेश्वरीचे श्रेष्ठ उपासक आणि प्रवचनकार ह भ प श्री चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या पसायदान विषयावरील त्रिदेविशीय प्रवचनाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती वेणू गोपाल तापडिया यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संत मोरारी बापू यांच्या प्रेरणेने संस्थेची स्थापना झाली असून अध्यात्म तसेच सामाजिक कार्याचे उद्दिष्ट स्वीकारत १९९८ पासून संस्था सोलापुरात कार्यरत आहे गेली बारा वर्षे संस्था चैतन्य महाराजांच्या अभ्यासपूर्ण चिंतनाचा लाभ शहरवासीयांना घडवीत आहे. मागील सलग दोन वर्ष कोविडमुळे प्रवचनाचे आयोजन होऊ शकले नव्हते. या प्रवचनास मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित रहावे असे संस्थेच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे. या पत्रकार परिषदेला गोपाळ सोमानी, शामसुंदर बलदवा, रमेश भुतडा आदी उपस्थित होते.

Shanti Education Society's

A. G. PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY SOLAPUR

Knowledge is Power

Near Saiful, Opp SRP Camp, Vijapur Road, Solapur (Maharashtra)

NAAC Accredited | www.agpit.edu.in | ISO 9001:2015 Certified


CIVIL ENGINEERING


COMPUTER ENGINEERING


ELECTRONICS & TELE. COMM. ENGG.


MECHANICAL ENGINEERING

ADMISSIONS OPEN (2022-23)

FIRST YEAR &
DIRECT SECOND YEAR (B.TECH)
Courses Offered @ FC 6308

| | |
|---|---|
| CIVIL ENGINEERING | 60 |
| COMPUTER ENGINEERING | 60 |
| ELECTRONICS & TELE. COMM ENGINEERING | 60 |
| MECHANICAL ENGINEERING | 60 |

We are Associated with :

Indian Space Research Organization
IIRS
POWERED BY swayam
NSTEDB Department of Sciences & Technology Government of India
Virtual Labs An MoE Govt of India Initiative
ENTREPRENEURSHIP DEVELOPMENT INSTITUTE OF INDIA
NPTEL
nirf NATIONAL INSTITUTIONAL RANKING FRAMEWORK
Ministry of Human Resource Development Government of India
INTERNSHALA
moodle
Ministry of Micro, Small and Medium Enterprises, Government of India
MSME
UNNAT BHARAT ABHIYAN
INSTITUTION'S INNOVATION COUNCIL (Ministry of HRD Initiative)

AGPIT ची वैशिष्ट्ये :

* शासनाच्या सर्व शिष्यवृत्ती उपलब्ध
* ए.आय.सी.टी.ई. कडून विविध उपक्रमांसाठी अनुदान
* राष्ट्रीय, बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांसोबत करारांतर्गत आधुनिक उपकरणे उपलब्ध
* नामांकित कंपन्यांमध्ये प्लेसमेंटची सुविधा
* डिजीटल लायब्ररी व बुक बँकची सुविधा
* अद्ययावत प्रयोगशाळा व कार्यशाळा
* 200 MBPS इंटरनेट आणि Free Wi-Fi कनेक्टिव्हीटी
* बस सुविधा उपलब्ध
* परगावाच्या मुला - मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृह व मेसची सोय

@80% Placements till now......

महाविद्यालयातील मोफत अधिकृत सुविधा केंद्राचा लाभा घ्यावा. रविवारी सुविधा केंद्र चालू असेल.

For First Year, Contact Details

Dr. R.V. Darekar Cell : 9850006308
Prof. S. J. Ligade Cell : 9423710564
Prof. R. M. Pantoji Cell : 9405548125
Prof. S. V. Patil Cell : 9561328933

For Direct Second Year, Contact Details

Dr. S. B. Gadwal Cell : 9130646448 HOD-MECH. ENGG.
Prof. S. V. Kulkarni Cell : 9420624370 HOD-COMP. ENGG.
Prof. T. D. Maslekar Cell : 9604199680 HOD-CIVIL ENGG.
Dr. R.V. Darekar Cell : 9850006308 HOD-E&TC ENGG.

CMYK

# विडी घरकुल येथे नशेत गळफास घेऊन आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

विडी घरकुल परिसरातील प्रगती चौकाजवळ राहणाऱ्या राकेश अंबादास आरगोंडा (वय ३१) या विवाहित तरुणाने दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. शुक्रवारी सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास राकेश आरगोंडा याचा मृतदेह घरातील छताच्या लोखंडी हुकला साडीने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीसात झाली. हवालदार कांबळे पुढील तपास करीत आहेत.



## फटाका उडाल्याने मुलगा भाजून जखमी

खेळताना फटाके चुलीत टाकले. त्याचा भडका होऊन डोळ्यास भाजल्याने ७ वर्षाचा मुलगा जखमी झाला. ही घटना रामपूर (ता.अक्कलकोट) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. अलीम बशीर बागवान (वय ७ रा.रामपूर) असे जखमी मुलाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी कौसर बागवान(आई) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले. काल सकाळी सात वाजेच्या सुमारास अलीम बागवान हा घरात खेळता खेळता फटाका चुलीत टाकला. त्यावेळी भडका होऊन फटाका त्याच्या उजव्या डोळ्याजवळ फुटला. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## म्हशीला धडकल्याने दुचाकीवरील तरुण ठार

बार्शी ते सोलापूर रोडवरील बीबीदारफळ जवळ म्हशीला धडकू गंभीर जखमी झालेला नवनाथ यशवंत चव्हाण (वय २२ रा.प्रताप नगर, सोरेगाव सोलापूर) हा खाजगी रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी रात्रीच्या सुमारास मरण पावला. नवनाथ चव्हाण हा गुरुवारी सायंकाळच्या सुमारास बार्शी येथून सोलापूर येथे दुचाकीवरून निघाला होता.बीबीदारफळ गावाजवळ अचानक म्हैस दुचाकी समोर आडवी आली. तिला धडकून तो गंभीर जखमी झाला होता. त्याला सोलापुरातील खाजगी रुग्णालयात दाखल केले असता तो काल मरण पावला. या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

## दुसऱ्या मजल्यावरून पडलेल्या जखमीचा मृत्यू

रविवार पेठ येथील दोनशे छप्पन्न गाळा येथे दुसऱ्या मजल्यावरील गच्चीवरून खाली पडून जखमी झालेले प्रकाश विठ्ठल आडकी(वय५०) हे शासकीय रुग्णालयात उपचार घेताना शुक्रवारी सायंकाळी मरण पावले.९ ऑक्टो. रोजी रात्रीच्या सुमारास ते दुसऱ्या मजल्यावरून शेजारच्या घरावरील पत्र्यावर पडून जखमी झाले होते. त्यांना खाजगी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. अशी नोंद जेलरोड पोलिसात झाली आहे .

## मालेगावात एक लाखाचे सोयाबीन पळवले

मालेगाव (ता.बार्शी) येथील महावीर भुयारे यांच्या शेताजवळ ठेवलेल्या ५५ कट्टे सोयाबीन चोरट्याने पळविले. ही चोरी शुक्रवारी पहाटेच्या सुमारास घडली. चोरीस गेलेल्या सोयाबीनची किंमत १ लाख १६ हजार रुपये इतकी असल्याची फिर्याद भास्कर मारुती घोडके (रा.मालेगाव) या शेतकऱ्यांनी वैराग पोलिसात दाखल केली. हवालदार नाईकनवरे पुढील तपास करीत आहेत

# ...अन् महाआघाडीचा करेक्ट कार्यक्रम केला : फडणवीस

सुराज्य/मंगळवेढा

पंढरपूर-मंगळवेढा पोटनिवडणुकीच्या जाहीर सभेत तुम्ही १०६ वा आमदार द्या; मी महाविकास आघाडी सरकारचा करेक्ट कार्यक्रम करतो' असे सांगितले होते. त्याप्रमाणे आम्ही मागच्या सरकारचा करेक्ट कार्यक्रम केला आहे आणि पांडुरंगाच्या आशीर्वादाने सरकार आले, असे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

पोटनिवडणुकीत तुम्ही समाधान आवताडे यांना निवडून दिलं. पण त्यांच्याही सभेत मी तेच आश्वासन दिले होते. मंगळवेढा उपसा सिंचन योजनेचे काम मी करणार. मला आनंद आहे की, तुमच्या सगळ्यांच्या आशीर्वादाने जे सांगितले होते की १०६ वा आमदार द्या; आम्ही करेक्ट कार्यक्रम करतो, त्याप्रमाणे आम्ही करेक्ट कार्यक्रम केला आहे. तुमच्या आणि पांडुरंगाच्या आशीर्वादने सरकार आले. आल्याबरोबर सरकारने या कामाला चांगली गती दिली. आमदार समाधान आवताडे यांनी पाठपुरावा केला, तसेच माजी आमदार प्रशांत परिचारकही माझ्याकडे यानिमित्त यायचे, असेही त्यांनी स्पष्ट केले.



ते पुढे म्हणाले की, (स्व.) सुधाकर परिचारक हे विधानसभा निवडणुकीला उभे होते. त्यावेळी मी एका प्रचासभेला आलो होतो. मंगळवेढा तालुक्यातील २४ गावांना पाणी देणारी मंगळवेढा उपसा सिंचन योजना मी करणार, असा शब्द दिला होता. मात्र, ते आश्वासन दिल्यानंतर आपलं सरकारच गेले. पण मी सांगितलं होतं की, मी पुन्हा येईन. तुमची योजनासुद्धा मी पुन्हा येण्याची वाट पाहत बसली. मधल्या सरकारने फाईल सरकावली देखील नाही. यावेळी खासदार जयसिध्देश्वर शिवाचार्य महास्वामी, खासदार रणजीतसिंह नाईक निंबाळकर, आमदार सचिन कल्याणशेट्टी, सुभाष देशमुख, रणजीतसिंह मोहिते-पाटील, राम सातपुते, शहाजी पाटील, लक्ष्मण ढोबळे, प्रशांत परिचारक, हर्षवर्धन पाटील, विजयराज डोंगरे आदी उपस्थित होते.

## हत्तुरे यांच्या स्मरणार्थ अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

सुराज्य/सोलापूर : लिंगेक्य सिद्रामप्पा मलप्पा हत्तुरे यांच्या १७ व्या पुण्यस्मरणा निमित्त सोमवार दि. ७ ते १४ नोव्हेंबर २०२२ पर्यंत अखंड हरिणाम सप्ताहाचे आयोजन कै. रकमाबाई हत्तुरे सांस्कृतिक भवन (मंगल कार्यालय) हत्तुरे नगर, होटगी रोड, येथे होणार आहे अशी माहिती धरेप्पा हत्तुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. सोलापूर येथे श्रीशैल हत्तुरे, हत्तुरे परिवार व हत्तुरे नगर वासिय यांच्यावतीने सप्ताहाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यामध्ये दररोज पहाटे ४ ते ६ काकडा आरती, १० ते १२ श्री संत जगदगुरु तुकाराम महाराज यांचे गाथावरील भजन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, ६ ते ७ प्रवचन, रात्री ८ ते १० हरिकीर्तन असे कार्यक्रम होणार आहेत. यामध्ये ह.भ.प.संजय पाटील महाराज, बसवराज शास्त्री हिरेमठ, निवृत्ती महाराज ताकमोगे, सोपान पवार महाराज, आनंददास चोरमोले महाराज, श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ आनंद शास्त्री महाराज यांची प्रवचने व कीर्तनकार ह.भ.प.मन्मथ महाराज बहिरमल उळे, ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली (महाराज) पंढरपूर, गवत महाराज चवरे पंढरपूर, ह.भ.प. प्रल्हाद महाराज सरडे, नांदुरी, बापूसाहेब देहुकर महाराज, ह.भ.प. भाऊसाहेब कदम महाराज घाटणेकर, भागवताचार्य भागवत महाराज बादाडे यांची हरिकीर्तने होणार आहेत. दि. १४ रोजी सकाळी ग्रंथ दिंडी, सकाळी १० ते १२ ह.भ.प.सुधाकर इंगळे महाराजांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. सदर पत्रकार धरेप्पा हत्तुरे, महेश हत्तुरे, वारकरी मंडळ शहर अध्यक्ष ह.भ.प. संजय पवार ह.भ.प. निवृत्ती महाराज ताकमोगे, विनायक हत्तुरे, ह.भ.प. माणिक कुलकर्णी, शशिकांत वसंतपुरे, आदी उपस्थित होते.

## चैतन्य जप प्रकल्पाच्या शिबिराची तयारी अंतिम टप्प्यात

सुराज्य/नातेपुते : चैतन्य जप प्रकल्पाचे राज्यस्तरीय शिबीर दि. १२ व १३ नोव्हेंबरला कारूंडे ता. माळशिरस, जि, सोलापुर या ठिकाणी होणार आहे. शिबिराची अंतिम टप्प्यात तयारी झाल्याची माहिती चैतन्य जप प्रकल्पाचे कार्याध्यक्ष शिबीर प्रमुख धैर्यशील देशमूख यांनी दिली.या शिबीरामध्ये काकड आरती, अंखठ सामूदायिक जप नामस्मरण, शोभायात्रा, मिरवणूक, प्रसाद, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण असे धार्मिक व सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच या शिबिरात राजेंद्र महाराज मोरे, संदिपबूवा मांडके, राजेंद्र आगवणे, गणपतराव जगताप यांचे प्रवचन कीर्तन होणार आहे. ' शिबिराचे उद्घाटन सूशिला महादेव पवार यांच्या हस्ते व भारती महाराज, विजयसिह मोहीते पाटील, माजी उपमूख्यमंत्री महाराष्ट राज्य, संजीवराजे नाईक निंबाळकर माजी जि.प. अध्यक्ष सातारा, आमदार राम सातपुते, आमदार दिपक चव्हाण, धैर्यशिल देशमूख, धनजय पवार, अमर जगताप, अमोल पाटील, लक्ष्मण आसबे, नंदकूमार जोशी, प्रकल्प विभाग प्रमूख राजेंद्र आगवणे, गणपतराव जगताप, साहेबराव देशमूख, विजय लोंढे, कू पद्मजा देव, अर्जून जाधव, अश्वीनी देऊस्कर याच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याचे धैर्यशील देशमूख यांनी सांगितले तसेच या शिबिरासाठी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन धैर्यशील देशमुख यांनी केले आहे.

## रस्त्याच्या कामास दोन दिवसात सुरुवात करणार : आयुक्त

सुराज्य/सोलापूर : मागील महिन्यामध्ये महापालिकेच्यावतीने शहरात विविध ठिकाणी रस्त्यांच्या डांबरीकरण करण्याचे कामे चालू करण्यात आले होते. मात्र सातत्याने होत असलेल्या पावसामुळे रस्त्याचे काम थांबले होते. आता पाऊस देखील थांबला आहे. यामुळे नगरअभियंता यांनी याबाबत आढावा बैठक घेतली असून रस्त्याच्या कामास दोन दिवसांमध्ये सुरुवात केली जाणार आहे, असे पालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सांगितले. शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांची मोठी दुरावस्था झाली होती. त्यामुळे येथे अनेक लहान-मोठे अपघात घडत होते. नागरिकांमधून संताप व्यक्त होत होता. यापूर्वीही काही रस्ते निकृष्ट दर्जाचे झाल्याच्या तक्रारी महापालिकडे आल्या होत्या तसेच काही ठेकेदारांवरही कारवाई करण्यात आली होती. यानंतर रस्त्यांचे डांबरीकरण करण्यासाठी महापालिकेने २२ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध केला आहे. यामधून सतरा रस्ते डांबरीकरण होणार आहेत. या रस्त्यांचे डांबरीकरण चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी पालिकेने अधिकाऱ्याची देखील नेमणूक केलेली आहे, असे आयुक्तांनी सांगितले.

## अकलूज येथे दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन

सुराज्य/अकलूज : अकलूज चे ग्रामदैवत श्री अकलाईदेवी देवस्थान येथे त्रिपुरारी पोर्णिमा निमित्त ७ नोव्हेंबर रोजी दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार ७ नोव्हेंबर रोजी सायं. ५-३० ते ७ या वेळेत श्री अकलाईदेवी मंदिर व मंदिर परिसरामध्ये दीपोत्सव आयोजीत केलेला आहे. तेव्हा भाविकांनी पणती, दिवे आणून या कार्यक्रमात सहभागी व्हावे. असे आवाहन श्री अकलाई देवी देवस्थान अकलूज चे कार्यकारी विश्वस्त जयसिंह(बाळदादा )शंकरराव मोहिते पाटील यांनी केले आहे.

# देशमुख यांचे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी : पाटील

सुराज्य/सोलापूर

मनिष देशमुख हे एक कुशल संघटक व संयमी स्वभावाने सुभाष देशमुख यांचा वारसा पुढे घेऊन जात आहेत. आज त्यांनी वाढदिवस पालावरच्या शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत साजरा केला हे अभिमानास्पद आहे. त्यांचे हे कार्य युवकांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन माजी नगरसेवक जगदीश पाटील यांनी केले.

भाजयुमो प्रदेश उपाध्यक्ष मनिष देशमुख यांचा वाढदिवस पालावरच्या शाळेतील विद्यार्थ्यांसमवेत साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त अक्षय अंजीखाने व सागर अतनुरे मित्र परिवाराच्यावतीने भटक्या विमुक्त प्रतिष्ठान संचलित संघाच्या पालावरच्या शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व मिठाई वाटप करण्यात आली. समाजाच्या शेवटच्या घटकाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ज्यापद्धतीने सुभाष व मनिष देशमुख काम करतात, तर त्यांच्या विचाराला साजेशा असा पद्धतीने वाढदिवस साजरा करावा याकरिता मित्र परिवाराच्या वतीने दरवर्षी सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते असे अक्षय अजिंखाने यांनी सांगितले.



उद्योजक अमर मालक बिराजदार मनिष देशमुख यांना शुभेच्छा देताना

म्हणाले की, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष पद मिळाल्यानंतरचा मनिष देशमुख यांचा पहिला वाढदिवस, लोकप्रयोगी व सामाजिक उपक्रमाने पार पडतोय ही खरंच आंनदाची बाब आहे. यावेळी शशि थोरात, सागर आतनुरे विद्यार्थ्यांचे व उपस्थित पाहुण्यांचे आभार मानले. या कार्यक्रमास सदर कार्यक्रम प्रसंगी माजी नगरसेवक जगदीश पाटील, शहर सरचिटणीस शशी थोरात, उद्योजक अमर बिराजदार, अमोल कारंडे, सिनेट सदस्य यतीराज होनमाने, बसवेश्वर सर्कलचे गुरुराज पदमगोंडा, सतीश पारेली आशिष दुलंगे, सिकंदर कतारी, विशाल कतारी व कार्यक्रमाचे आयोजक अक्षय अंजिखाने व सागर अतनुरे उपस्थित होते.

## कुसमोड येथे ड्रोनद्वारे भुमापन सर्व्हेस प्रारंभ

सुराज्य/पिलीव : माळशिरस तालुक्यातील कुसमोड येथे स्वामीत्तव योजनेअंतर्गत भुमीअभिलेख विभाग व माळशिरस पंचायत समिती व सर्व्हे ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने कुसमोड येथे ड्रोन सर्व्हे क्षण कार्यक्रमाचा प्रायोगीक तत्वावर प्रारंभ माळशिरस तालुक्याचे गटविकास अधिकारी गुळवे, तसेच भुमीअभीलेख अधिक्षक पाटील मॅडम, सरपंच तुषार लवटे, उपसरपंच राणी पवार यांच्या सह अनेक मान्यवरांचा उपस्थितीत करण्यात आला.

यावेळी कुसमोडचे ग्रामविकास अधिकारी नवले यांनी प्रास्ताविकामध्ये या योजनेनुसार गावातील मालमत्ता याचे अचुकपणे मोजमाप होणार असल्याचे सांगितले. गटविकास अधिकारी विजय गुळवे यांनी माळशिरस तालुक्यातील ५० गावांचे डोदवारे सर्व्हक्षण करण्यात येणार असल्याचे सांगितले. कुसमोड गावात गावठाणातील १०७ मालमत्ता व शासकीय मालमत्तेचे सर्व्हे क्षण केले जाणार आहे. या कार्यक्रमास सिताराम धायगुडे, सरपंच महादेव पाटील, सरपंच अक्षय धांडोरे, मनोहर लवटे, सदस्य, महावीर धायगुडे, शहाजी लेंगरे, लक्ष्मण पवार, संजय पाटील, शहाजी वाघ, अज्ञान धायगुडे, शत्रुघ्न वाघ, सतीश व्होनमाने, देवा धायगुडे, , विविध गावातील ग्रामसेवक, तलाठी, शिक्षक, ग्रामस्थ यावेळी मोठ्या संखेने उपस्थित होते.

# समाचार चौक परिसरात 'साळींदर' आढळला

सुराज्य/सोलापूर

शहरातील समाचार चौक परिसरात साळींदर प्राणी आढळून आल्याने परिसरात घबराटीचे वातावरण आहे. साळींदर प्राणी हा मुळात जंगलात राहणारा असून त्याच्या अंगावर काटेरी असे काटे असलेले पिसारे असतात. स्वतःच्या रक्षणासाठी तो काटेरी पिसारे फुलवत असतो. मात्र आता समाचार चौकातील एका सीसीटीव्ही कॅमेरात तो वावरत असताना दिसून आला आहे.

याबाबत सोलापूर जिल्ह्याचे मानद वन्यजीव रक्षक भरत छेडा यांना माहिती मिळताच त्यांनी कळविले आहे की, नागरिकांनी घाबरून न जाता या प्राण्यास मारू नये आणि तो दिसल्यास त्वरित वन विभागाशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

सोलापूर शहरात आणि आसपासच्या परिसरात अनेक वन्यजीव प्राणी आढळून येत आहेत. गेल्या दीड वर्षांपूर्वी सोलापूर शहराजवळ असलेल्या चिंचोली एमआयडीसी परिसरात बिबट्याचा वावर होता. त्यानंतर अक्कलकोट तालुका परिसरात गवा आढळून आल्याचं समोर आलं तर कोरोना काळात तुळजापूर रोड वरती असलेल्या एका



गावाजवळ निलगाय जखमी अवस्थेत मिळाली होती. वनविभागाने आणि नेचर कंजर्वेशन सर्कलने त्यावर उपचार केले होते. आता साळींदर प्राणी आढळून आल्याने घबराट पसरली आहे.

# बिडकर याची वॉटर पोलोमध्ये भारतीय संघात निवड

सुराज्य/सोलापूर

थायलंड येथे होणाऱ्या एशियन चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी सोलापूरचा ऋतुराज बिडकर याची वॉटर पोलोसाठी भारतीय संघात निवड झाली आहे.

सोलापूरचे थोरला मंगळा तालीम चे प्रमुख पदाधिकारी व एसटी महामंडळात वाहतूक नियंत्रण पदावर नुकतेच सेवानिवृत्त झालेले बाळासाहेब बिडकर यांचे सुपुत्र चिरंजीव ऋतुराज बिडकर याची एशियन चॅम्पियनशिप वाटर पोलो खेळ प्रकारात थेट भारतीय संघात निवड करण्यात आली .या स्पर्धा थायलंड होणार आहे त्याबाबतचे भारताकडून स्विमिंग फेडरेशन ऑफ इंडिया निवड प्रक्रियेचे अधिकृत पत्र नुकतेच प्रसार माध्यमाकडे जाहीर केले.भारतीय संघात महाराष्ट्राकडून एकांची निवड करण्यात आली आहे.

लहानपणापासून ऋतुराज बिडकर हा स्पोर्ट्स पॅवेलियन अॅकॅडमीचा खेळाडू असून त्याला लहानपणापासून अथलेटिक्स या खेळाची आवड होती अनेक १०० मी धावणे, लांब उडी प्रकारात अनेक पदक प्राप्त केला आहे ऋतुराजला लहानपणापासून सुहास छंचुरे यांचे मार्गदर्शन मिळत गेले तसेच पुढील शिक्षण त्यांनी गांधी नाथा रंगजी विद्यालयात झाले तेथे त्यांने शालेय स्विमिंग प्रकारात राज्य, राष्ट्रीय स्तरापर्यंत मजल मारली होती व अनेकही पदके तरी प्राप्त केले आहेत पुढील शिक्षण त्यांनी संगमेश्वर महाविद्यालयात येथे पूर्ण केले नंतर चढ्ढ या शैक्षणिक वर्षाचे शिक्षण हे पुणे येथे युवर सिटी सर परशुराम बहु महाविद्यालयातून घेतोय गेल्या दहा-बारा वर्षांपासून तो सराव करत आहे. ऋतुराजने महाराष्ट्रातील मुंबई, नाशिक, गोवा येथे झालेल्या विविध स्पर्धे त नाविन्यपूर्ण यदयवीत यश संपादन केले.

## आज मराठा महासंघाची सर्वसाधारण सभा

सुराज्य/कुर्डूवाडी : पंढरपूर येथे रविवारी सकाळी ११.३० वाजता तनपुरे महाराज मठ येथे अखिल भारतीय मराठा महासंघाची सर्वसाधारण सभा होणार असून २०२२ ते २०२५ या कार्यकाळाकरिता पदाधिकारी निवडणार असल्याची माहिती संघटनेचे प्रभारी अध्यक्ष व सरचिटणीस राजेंद्र कोंढरे यांनी पत्रकाद्वारे दिली.

आ. नरेंद्र पाटील यांचा विशेष सत्कार होणारा असून विविध विषयांवर ती चर्चा होणार असल्याचे जल्हाध्यक्ष संदीप भोरे यांनी सांगितले. सदरच्या सर्वसाधारण सभेला पंढरपूर येथे सोलापूर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष राजेंद्र कोंढरे व जिल्हाध्यक्ष संदीप भोरे यांनी केले आहे.

**CHANGE IN NAME**

I HEREBY DECLARE THAT MY OLD NAME JOHEDA JANODDIN SHAIKH HAS BEEN CHANGED TO **JAHEDABI AURANGAJEB NAIKWADI** RESIDING AT 446, DAKSHIN SADAR BAZAR, NEAR SHRIRAM BAKERY, SOLAPUR-413003. KINDLY NOTE THE SAME.

## शालन सोनार यांचे निधन



सुराज्य/उ. सोलापूर : उत्तर सोलापूर तालुक्यातील मार्डी येथील शालन सिद्राम सोनार (वय ३३) यांचे निधन झाले.त्यांच्या पश्चात आई,वडील,चार बहिणी, दोन भाऊ असा परिवार आहे.

# १०८ सामूहिक सत्यनारायण व्रतपूजन भक्तिभावात

सुराज्य/सोलापूर

कार्तिक मास अर्थात शिवकेशव मास प्रित्यर्थ पद्मब्राम्हण पौरोहित संघमच्या वतीने १०८ सामूहिक सत्यनारायण व्रतपूजन कार्तिक शुद्ध दशमी तिथी मुहूर्तावर पार पडला पुर्व भागातील पद्मावती कॅनव्हेंशन हॉल येथे अत्यंत भक्तीभाव, उत्साह पूर्ण वातावरणात वे व्रथपूजन संपन्न झाले

सकाळी ७ वाजून ३० होमहवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली, होमहवन विधीनंतर श्री सत्यनारायण व्रतपुजन सुरू होऊन महाआरतीने सांगता झाली. कार्यक्रमाच्या वेळी प्रसिद्ध उद्योजक टेक्सटाईल संचालक पेंटप्पा गड्डम, पद्मावती कॅन्व्हेंशन हॉल संचालक गंगाधर देवसानी कवयित्री रेणुका बुधारम, उद्योजक राजेशम बोल्ली, स्वराज्य संघमचे गुरुजी ब्रम्हश्री नरसिंहनंद अल्ली महाराज उपस्थिती होते. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अखिल भारत पद्मब्राम्हण पौरोहित संघम जनरल सेक्रेटरी ब्रम्हश्री पुंडलिकानंद ताटीपामुल पंतुलु, सोलापूर पद्मब्राम्हण संघमचे अध्यक्ष राजेश मागणुर पंतूलू, ब्रम्हश्री सत्यनारायण जोगु पंतुल, जयेश सायपूर पंतुल, अंबादास शावंतूल पंतुल, विश्वेश्वर गड्डम पंतुल, अंबादास बिटला पंतूलु, मनोज सामल पंतुल, बलराज दोंतुल पंतुल, राजा बुर्ला पंतूलू, अशोक बिटला पंतुल, गणेश आरकाल, कनकय्या यलदंडी पंतुल, गोविंद नागुल पंतुल, , ढ़ अरविंद बिटला पंतुलु, सुकुमार सिद्धम आदींच्या परिश्रमाने कार्यक्रम यशस्वी झाला.



**जाहीर प्रगटन**

**कै.माधवराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट,गोळेगाव ता. पुर्णा जि. परभणी. या न्यायासी स्थावर मिळकत विक्रीकरीता अर्ज क्र.१०/२०२१ कलम ३६-I (a) मध्ये जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस कळविण्यात येते की कै.माधवराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट,गोळेगाव ता.पुर्णा जि. परभणी, नोंदणी **क्र.ई-७८** (परभणी) या न्यासाच्या मालकीची मौजे शेगांवदुमाला ता.पंढरपूर जि.सोलापूर येथील गट नं.१३९/२/अ मधील शेतजमीन क्षेत्रफळ ० हेक्टर २० आर (२००० चौ.मि.) एवढी जमीन विक्री करावयाची **असुन जिची चर्तु:सिमा पुढील प्रमाणेआहे.पुर्वेस-गट नं.१३९/२/ब (पै.शिल्लक) पश्चिमेस-गट नं.१४७ (पै.शिल्लक),दक्षिणेस- गट नं.१३८, उत्तरेस गट नं.१३९/१३८**न्यासाच्या कामाकरिता खालील अटींच्या अधिन राहुन विक्री करणे आहे.

१) मिळकत खरेदी करण्यासाठी निविदा **दि.०५/१२/२०२२** दुपारी **०६.१५** वाजेपर्यंत निविदा सिलबंद लिफाफ्यामध्ये **न्यासाचे नांवे रुपये २०,०००/- (वीस हजार रुपये) चा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (Demand Draft)** मा.धर्मादाय सह.आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद यांचे कार्यालयात **अधिक्षक यांचेकडे सादर करावेत.**

२) सर्व निविदा **दि.०८/१२/२०२२** रोजी दुपारी **३.३०** वाजता मा.धर्मादाय सह.आयुक्त औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे समोर उघडण्यात येतील.

३) सर्व निविदा धारकांना मा.धर्मादाय सह.आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे समोर दि.०८/१२/२०२२ रोजी दुपारी ०३.३० वाजता मिळकत विक्रीच्या जाहीर लिलावात भाग घेता येईल.

४) निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचे अधिकार मा.धर्मादाय सह.आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना असतील तसेच याबाबतीत कुठलीही उजर अथवा आक्षेप ऐकला जाणार नाही.

५) जर निविदा धारकांनी माघार घेतल्यास डी.डी.ची रक्कम ही ट्रस्ट च्या खात्यात जमा करण्यात येईल याची नोंद निविदा धारकांनी घेण्यात यावी.

सबब आज **दि.०४/११/२०२२** रोजी येथे औरंगाबाद येथे जाहीर प्रगटन जारी केले.

आदेशावरुन ,
सही/-
(जी.एच.पाटील)
शिरस्तेदार

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
औरंगाबाद विभाग,औरंगाबाद

प्रत- १) दैनिक वर्तमान पत्र सोलापूर
२)मा.जिल्हाधिकारी कार्यालय नोटीस बोर्ड,परभणी,सोलापूर
३)तहसिलदार कार्यालय नोटीस बोर्ड,ता.व जि.परभणी व सोलापूर
४)ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्ड,मौजे शेगांवदुमाला ता.पंढरपूर जि.सोलापूर.
५)न्यासाच्या उपरोक्त मालमत्तेवर सहज दिसणा-या/ दर्शनी भागावर, परभणी.
६) जी मालमत्ता विक्री करावयाची आहे त्यावर,मौजे शेगांवदुमाला ता.पंढरपूर जि.सोलापूर
७) कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर,औरंगाबाद,परभणी व सोलापूर

## दोन दिवसानंतर सार्वजनिक नळ तोडण्याची मोहीम

सुराज्य/सोलापूर

**पाण्याचा अपव्यय होऊन मोठ्या प्रमाणावर पाणी वाहून जात असल्यामुळे सार्वजनिक नळ कनेक्शन मोहीम दोन दिवसामध्ये सुरू करणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली. शहरातील तिन्ही आमदारांनी या नळ तोडणी मोहिमेस विरोध केल्यानंतर दिवाळीपूर्वी पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिवाळीपर्यंत नळ तोडणी मोहिमेस स्थगित दिली होती.**



पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आणि मीटर सिस्टीम बसवण्यासाठी दसऱ्याच्या दरम्यान महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी सार्वजनिक नळ बंद करण्याचे आदेश दिले होते. मात्र, जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत आयुक्तालयाच्या या निर्णयाला तिन्ही आमदारांनी विरोध केला होता. त्यामुळे दिवाळीच्या तोंडावर पालकमंत्री विखे-पाटील यांनी सार्वजनिक नळ बंद करू नये, असे आदेश देत स्थानिक आमदाराशी चर्चा करून पुढील निर्णय घ्यावा, असे सांगितले होते. तसेच याबाबत जनजागृती करण्याच्या सूचना देखील केल्या होत्या. यानंतर महापालिकेने जनजागरण मोहीम राबवली होती. आता दिवाळीनंतर सार्वजनिक नळ बंद करण्यात येणार असल्याचे आयुक्तालयांनी सांगितले असून दोन दिवसामध्ये सुरू करणार असल्याचे देखील आयुक्तांनी सांगितले.

# सांगूनही अधिकारी कामे करत नसल्याचा सुरेश पाटलांचा आरोप

## झोन क्रमांक दोन; तीनमध्ये टाळे टोको आंदोलन

सुराज्य/सोलापूर

**वारंवार सांगूनही ड्रेनिज लाईनमधील घाण पाण्याचा बंदोबस्त न केल्याने झोन अधिकारी, एसआय, सीएसआय, जेई व एई कोणत्याही अधिकाऱ्यांचे लक्ष नसल्याने माजी नगरसेवक सुरेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली झोन क्रमांक दोन आणि झोन क्रमांक तीनमध्ये टाळे टोको आंदोलन करण्यात आले.**

गेल्या अनेक महिन्यांपासून महापालिका आयुक्त आणि झोन क्रमांक दोन, झोन क्रमांक तीनमध्ये स्मार्ट सिटीच्या मंजूर असलेल्या काम ाची पिण्याच्या पाण्याचे पाईपलाईन, ड्रेनेज लाईन, रस्ता व काँक्रीट रस्ते त्याचबरोबर इतर सर्व कामे निकृष्ट दर्जाचे व बोगस कामे तसेच बेकायदेशीर कामे झाल्याने निवेदन देऊन आणि आंदोलन करून देखील आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्तांनी कामासंदर्भात चौकशी केली नाही म्हणून हे आंदोलन केल्याचे पाटील यांनी सांगितले.

गेल्या काही महिन्यांपूर्वी सोलापूर महानगरपालिकेचे अधिकारी आणि स्मार्ट सिटीचे अधिकारी झोन क्रमांक तीनच्या हद्दीत असलेल्या प्रभाग क्रमांक दोन व तीनमध्ये असलेल्या ड्रेनेज लाईन, पिण्याचे पाईपलाईन, रस्ता काँक्रीटीकरण त्याचप्रमाणे इतर सर्व कामांची पाहणी करण्यात आले होते. महापालिकेचा अधिकाऱ्यांकडून आणि स्मार्ट सिटी अधिकाऱ्यांकडून रस्त्याची कामे करण्यात आले होते पण ते अत्यंत निकृष्ट दर्जाची झाली आहेत.

प्रभाग क्रमांक तीनमध्ये स्मार्ट सिटीचे व महापालिकेच्या झालेली कामे म्हणजेच पिण्याचे पाण्याचे पाईप लाईन, ड्रेनिज लाईन,




रस्त्याची कामे, फूटपाथ आणि इतर सर्व कामे निकृष्ट दर्जाचे झालेलं आहे. बेकायदेशीर आणि चुकीच्या पद्धतीने जोडणी करून काम केल्याने पिण्याचे पाणी आणि ड्रेनेजचे पाणी रस्त्यावरून वाहत जात आहे. याची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी माजी सभागृह नेता सुरेश पाटील यांनी केली.

टाळे टोको आंदोलन करण्यात आल्याने संबंधित अधिकाऱ्यांनी म क्तेदारांना बोलावून काम सुरू केले त्यामुळे आंदोलन रद्द करण्यात आले. याप्रसंगी अजय उदगिरी, रघुनाथ मिस्किन, सूर्यकांत जिंदम, सागर अतनुरे, गुरु पदम्‌गोंडा, वेंकटेश जाटगल, शिव मंदकल, म ुदका करली, बिपिन पाटील, विजय कोळी, विजय गोरकल, चिदानंद मासरेड्डी, सिद्राम शेकशिंदी, नवीन गोटीमुक्कुल, प्रशांत गाडेकर, पवन तगारे, सिद्धारूढ गंदाळकर, सिद्धेश्वर पाटील, प्रकाश साळुंखे, संतोष कोळी, प्रभू कोळी, श्रीनिवास संकाराम, रवी मंदकल, सुरेश मंदकल, साळुंके आदी उपस्थित होते.

## विमानसेवेसाठी सोलापूर विकास मंचाचे आजपासून चक्री उपोषण

सुराज्य/सोलापूर

**सोलापूर विकास मंचच्यावतीने येत्या रविवार दि. ६ नोव्हेंबर २०२२ पासून सोलापुरातील होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू होईपर्यंत जिल्हा परिषद पूनम गेट येथे चक्रीउपोषण करण्यात येणार असल्याची माहिती सोलापूर विकास मंचाचे केतन शहा यांनी पत्रकार परिषदेत दिली.**

सोलापूर विकास मंच हे गेली तीन वर्षे सातत्याने होटगीरोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू व्हावी यासाठी सनदशीर मार्गाने व संवैधानिक पद्धतीने प्रयत्न करत आहे. केंद्र सरकारच्या उडान योजनेअंतर्गत होटगी रोड विमानतळाचा समावेश असून सुद्धा सोलापुरातील सामान्य नागरिक विमानसेवेपासून वंचित आहे. त्यामुळे चक्री उपोषण करण्यात येणार आहे.

हायकोर्टाने नागरी उड्डयन क्षेत्रातील सर्वोच्च स्वायत्त संस्थेला आठ आठवड्यांत विमानसेवेतील अडथळ्यां विषयी आपला अहवाल सादर करायला सांगितले होते. आज २२ आठवडे उलटून गेले आपला अहवाल सादर केला नाही विमानसेवेतील सर्व अडथळे दूर करणे ही स्थानिक प्रशासनाची म्हणजे मनपा आयुक्त व जिल्हाधिकारी यांचीच आहे. या ढिम्म प्रशासनाला त्यांच्या कर्तव्याची जाणीव करून देण्यासाठी चक्री उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागत आहे. हे आंदोलन ६ नोव्हेंबरपासून दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत विमानसेवा बाबतीत ठोस कारवाई होईपर्यंत सुरू राहणार आहे, असे त्यांनी सांगितले.

## निविदेप्रमाणे कामे करण्याची मागणी

सुराज्य/कुर्डूवाडी : कुर्डूवाडी नगरपालिका संचलित छत्रपती शिवाजी महाराज शाळा क्रमांक एकमध्ये शाळेच्या वर्ग खोल्यांचे पत्रे टाकणे आदी कामे निकृष्ट दर्जाची होत असून ती निविदेप्रमाणे करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष शंकर बागल यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

कुर्डूवाडी नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनामध्ये छत्रपती शिवाजी महाराज शाळा क्र. १ मधील स्टेज (व्यासपीठ) चे काम शाळेचे पत्रे व फरशी कामे सुरू आहेत. या ठिकाणच्या कामाची पाहणी करण्यास गेलो असता हे दोन्ही काम निकृष्ट दर्जाचे असल्याचे पहावयास मिळाले.

या कामांमध्ये वर्ग खोल्यांचे नव्याने पत्रे टाकण्याचे काम सुरू आहे ते पत्रे आयाएसओ प्रमाणित पत्रे नाहीत, पत्राखालील कैचींचे प्रमाण कमी असल्याचे चैनल क्वॉलिटी व्यवस्थित नाही, फरशी बसवण्याचे कामे, व्यासपीठाचे घेतलेले खड्डे वापरण्यात आलेले स्टील, फुटींगमध्ये वापरलेल्या जाळीला वापरलेले स्टील, व्यासपीठाच्या मध्यभागी मातीचा मोठा ढीग आहे. हीच माती या कामासाठी वापरण्यात येत आहे.

## पैसे घेतल्याच्या कारणावरून मारहाण

सुराज्य/सोलापूर : तुझी आई तुला बोलवली आहे, असे सांगून बाहेर घेऊन जाऊन माझ्या आईकडून घेतलेले पैसे तू देणार आहे का नाही असे म्हणत शिवीगाळ करत लोखंडी वस्तूने मारहाण करून जखमी केल्याची घटना दि. २ नोव्हेंबर रोजी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास साईनगर स्मशानभूमी जवळ घडली.

याप्रकरणी दौलतराव दत्तात्रय हिरापुरे (वय-२६, रा. साईनगर स्मशानभूमी जवळ, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून सचिन नागनाथ माने (रा. साईनगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक मणुरे हे करीत आहेत.

## पोखरापूर फाट्यालगत ठिकठिकाणी काटेरी झुडपे

### वाहनधारकांना धोका

सुराज्य/चिखली

**सोलापूर-पुणे हायवेला जोडण्यात आलेल्या यावली पोखरापूर फाट्या लगत ठिकठिकाणी काटेरी झुडपे उगवली आहेत. या झुडपांमुळे महामार्गावरील समोरून येणारे वाहन दिसत नाही. तसेच काटेरी फांद्याचा फटका प्रवाशांना बसत असतो. ही काटेरी झुडपे तोडण्यात यावीत, अशी मागणी येथील नागरिकांनी केली आहे.**



यावली ते पोखरापूर रस्त्याने भरपूर रहदारी असून या रस्त्याच्या मार्गाने पुणे, सोलापूर, मोहोळ, मुंबई, कुर्डूवाडी, माढा, अनगर आदी ठिकाणी जाणे करीत या परिसरातील नागरिकांना याच रस्त्याने यावे लागते. परंतु या रस्त्याची गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्था झाली आहे. रस्त्याची खडी पूर्णत: उखडली आहे. एवढेच नव्हे तर रस्त्यावर जागोजागी मोठमोठे खड्डे पडले आहेत.

खड्यांबरोबर काटेरी झुडपांनी सुध्दा रस्ता व्यापला गेला आहे. येथील शेतकऱ्यांना शेती कामाला जाण्यासाठी शिवाय अन्य कामासाठी येथील नागरिकांना व शाळेतील मुलांना या रस्त्याचा वापर करावा लागतो. या रस्त्याने शाळेतील मुलांना मोटारसायकलवरून शाळेत जाता येताना सोलापूर-पुणे हायवे रोडलगत असणारी काटेरी झुडपे सतत अंगाला लागून यात अनेक शाळेतील मुलांना गंभीर दुखापत झाली आहे.

तरी याकडे संबंधित महामार्ग विभागाच्या अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष घालून यावली खवणी फाट्यावरील वाढलेली काटेरी झुडपे त्वरित काढावीत आणि हा रस्ता तातडीने मोकळा करून द्यावा. शिवाय यावली ते पोखरापूर हा रस्ता ज्या विभागाच्या अधोरेखित येतो त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुध्दा जागोजागी उखडून गेलेला रस्ता तातडीने दुरुस्त करावा, अशी मागणी येथील ग्रामस्थ व शेतकऱ्यांसह शाळेतील विद्यार्थ्यांनी केली आहे.

## घंटा गाडी होणार सुरळीत

सुराज्य/सोलापूर

शहरातील कांही भागामध्ये घंटा गाडी खंडित स्वरूपामध्ये होत होती. याचा आढावा घेण्यात आला असून आता घंटागाडी सुरळीत होणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी दिली. ऐन दिवाळीमध्येच शहरातील काही भागामध्ये घंटागाडी पोहचत नसल्याच्या तक्रार मनपा प्रशासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. काहर ठिकाणी एक दिवसाआड तर कांही ठिकाणी दोन ते तीन दिवस घंटा गाडी पोहचत नसल्याच्या तक्रार देखील करण्यात येत होत्या. यानंतर आयुक्तांनी या संदभात आढावा बैठक घेतली आहे. यानंतर नियमितरित्या घंटागाडी चालू राहणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

## पार्कवरील मातीची मैदाने भाडेतत्वावर देण्याची बैठक तहकूब

### जिल्हा क्रीडा महासंघाचाही विरोध

सुराज्य/सोलापूर

पार्क मैदानामागील नियोजित व्हॉलीबॉल, कबड्डी, खो-खो मैदानाच्या भाडे आकारणीसाठी स्टेडियम समितीची बैठक महापालिका आयुक्त पी. शिवशंकर यांनी शुक्रवारी सकाळी बोलाविली होती. या बैठकीच्यावेळी शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते हाजीमलंग नदाफ व जिल्हाक्रीडाधिकारी नितीन तारळकर, पालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप, पालिका क्रीडाधिकारी एम. के. शहापुरे उपस्थित होते. परंतु अनेक सदस्य अनुपस्थित असल्यामुळे त्यांनी ही बैठक तहकूब केली आणि मैदानाच्या भाडेवाढ ठरविण्यासाठी अभ्यास करून प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी शहापुरे यांना दिल्या.

या मैदानांबरोबरच जीम आणि टेबल टेनिस हॉलसाठी भाडे आकारणी प्रस्ताव महापालिका प्रशासन आणू पाहत आहे. याला विविध जिल्हा क्रीडा संघटनांनी विरोध केला आहे. तसेच जिल्हा क्रीडा महासंघाचे पदाधिकारी व सदस्य यांनी शुक्रवारी सकाळी महापालिका आयुक्त पी. शिवशंकर याची भेट घेऊन, ही मैदाने जिल्हा संघटनेला भाडे तत्वावर न देता नि:शुल्क द्या आणि ही मैदाने संघटनेच्या मार्गदर्शनाखाली तयार करावीत, अशी भूमिका मांडली व निवेदन दिले. त्यानुसार विचार करून निर्णय घेण्याचे आश्वासन पालिका आयुक्तांनी त्यांना दिले.

यावेळी जिल्हा क्रीडा महासंघाचे अध्यक्ष प्रा. डॉ. पुरणचंद्र पुंजाल, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रकाश काटूळे, झुबिन अमेरिया (जलतरण) झेड. एम. पुणेकर (टेबल टेनिस), मरगू जाधव, मदन गायकवाड, संजय मोरे (कबड्डी), सुदेश मालप, अनिल यरगल (व्हॉलीबॉल), आनंद चव्हाण (हँडबॉल), एम. शफी (बास्केटबॉल), प्रिया पवार, सुनील चव्हाण, श्रीरंग बनसोडे (खो-खो), किरण चौगुले (फुटबॉल), राजेंद्र माने (बॉलबॅडमिंटन), चंद्रकांत रेंबुर्सू (क्रिकेट), दशरथ गुरव (थलेटिक्स) जिल्हा संघटनेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## 'देऋब्रा'चे बडोद्याला १२-१३ रोजी रौप्य महोत्सवी अधिवेशन

सुराज्य/सोलापूर

**अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ मुंबई या संस्थेचे रौप्य महोत्सवी अधिवेशन येत्या १२ आणि १३ नोव्हेंबरला गुजरातमधील बडोदा या शहरात होत आहे. या अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती मध्यवर्ती मंडळाचे कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांनी दिली आहे.**

या अधिवेशनाला शनिवार सकाळी ९ वाजता सुरुवात होईल. त्यानंतर दुपारी १२ वाजता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होईल. या दोन दिवस होणाऱ्या अधिवेशनात युवकांचे प्रश्न, महिलांचा उद्योग व्यवसायाविषयक मेळावा, समाज संघटन, अशा विविध विषयावर चर्चासत्रे, परिसंवाद, व्याख्याने होणार आहेत.

रविवार १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी या अधिवेशनाचा समारोप होणार आहे. हे अधिवेशन रौप्य महोत्सवी अधिवेशन असून या अधिवेशनास देशभरातील मध्यवर्ती मंडळाशी संलग्न असलेल्या संस्थांचे सुमारे ५०० प्रतिनिधी उपस्थित राहतील, अशी माहितीही प्रभाकर कुलकर्णी यांनी दिली. तरी या अधिवेशनात अधिकाधिक संख्येने ज्ञाती बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

### सोलापूरहून ५० प्रतिनिधी जाणार

बडोदा येथे होणाऱ्या अधिवेशनास मंगळवेढा, मोहोळ आणि सोलापूर शहर अशा विविध ठिकाणचे सुमारे ५० प्रतिनिधी या अधिवेशनासाठी येत्या ८ नोव्हेंबरला बडोद्याला जाणार आहेत, असे सोलापूरचे संयोजक सतीश पाटील, पत्रकार दत्तात्रय आराध्ये यांनी दिली आहे. या संदर्भात नुकतीच अधिवेशनाला जाणाऱ्या प्रतिनिधींची बैठक होऊन त्यात नियोजन करण्यात आले आहे.

### डॉ. येळेगावकर यांना ऋग्वेद भूषण पुरस्कार

अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळातर्फे सोलापूर देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्थेचे अध्यक्ष डॉ. श्रीकांत येळेगावकर यांना ऋग्वेद भूषण हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. शाल, श्रीफल, सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे वितरण बडोदा येथे होणाऱ्या अधिवेशनात होणार आहे, अशी माहितीही कार्याध्यक्ष प्रभाकर कुलकर्णी यांनी दिली.

## सहाय्यक फौजदाराकडून तरुणास बेदम मारहाण; चौघांवर गुन्हा

### जुळे सोलापुरातील घटना

सुराज्य/सोलापूर : तू माझा जावईसोबत का फिरतो या कारणावरून एका सहाय्यक फौजदारासह चौघानी मिळून तरुणास शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केल्याची घटना दि.२ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास रिलायन्स स्मार्ट पॉईट, म्हेत्रे टॉवर जुळे सोलापूर येथे घडली.

याप्रकरणी प्रदीप विकास पाटील (वय-२७, रा. मिनानगर, बॉम्बे पार्क जवळ, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सहाय्यक फौजदार महेश शेजेराव, हर्षवर्धन शेजेराव, श्रीकांत कोळी व संतोष कोळी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी व सहाय्यक फौजदार महेश शेजेराव यांचे जावई नितीन अनिल पतंगराव हे दोघे रिलायन्स स्मार्ट पॉईंट येथे मिळून काम करतात. प्रदीप आणि नितीन हे रिलायन्स स्मार्ट पॉईंट येथील मालाचे डिलिव्हरी करण्यासाठी एकत्र फिरत असतात. फिर्यादी यांच्या स्टाफ मधील एका कर्मचाऱ्यांच्या वाढदिवस असल्याने सगळेजण रिलायन्स स्मार्ट पॉईंट येथे थांबले होते.त्यावेळी तेथे महेश शेजेराव यांनी फिर्यादीस बाहेर बोलावून शिवीगाळ करून तु माझा जावई नितीन याच्यासोबत का फिरतोस असे म्हणून महेश शेजेराव यांच्यासोबत आलेले हर्षवर्धन शेजेराव, श्रीकांत कोळी, संतोष कोळी या चौघांनी मिळून फिर्यादीस लाथाबुक्क्यांनी मारहाण केली.

सुराज्य सोलापूर
**Classified**
विवाह विषयक
● सर्व जाती धर्मातील प्रथम वधु/वर, विदुर, विधवा, घटस्फोटीत, आंतरजातीय, शासकीय/निमशासकी भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा लग्न जमेपर्यंत स्थळं उपलब्ध करुन दिले जातील.
श्री तुळजाभवानी वधु-वर सुचक केंद्र, तुळजापूर.
संपर्क : 7387906921
(121122)

## अकलूजचा श्रीराम हॉर्स शो देशपातळीवर नावाजलेला : पोसाना

सुराज्य/अकलूज

लोकनेते स्वर्गीय प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या स्मरणार्थ त्यांचे चिरंजीव डॉ. धवलसिंह मोहिते - पाटील हे अकलूज येथे नुखरे आणि मारवाड जातीचे अश्व प्रदर्शन स्पर्धा गेल्या चार वर्षापासून आयोजित करीत असून अकलूजचा हा श्रीराम हॉर्स शो हा देश पातळीवरील मोजक्या दोन ते तीन शोमध्ये गणला जात असल्याचे गौरवोद्गार राजस्थान येथील महाराज गर्जेंद्रपालसिंग पोसाना यांनी काढले.

डॉ. धवलसिंह मोहिते पाटील यांनी अकलूज येथे लोकनेते स्व. प्रतापसिंह मोहिते पाटील यांच्या स्मरणार्थ आयोजित श्रीराम हॉर्स शो स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

अध्यक्षस्थानी फत्तेसिंह माने पाटील होते तर व्यासपीठावर बारामती येथील रणजित अण्णा पवार, आयोजक डॉ. धवलसिंह मोहिते पाटील, लातूर ग्रामीणचे आ. धीरज देशमुख, हैदराबाद येथील नवाब मुजाहिद आलम खान,पुणे येथील उद्योगपती आदित्यराजे घुले-पाटील, सिनेट सदस्य पद्मजादेवी मोहिते-पाटील, धनश्री घुले पाटील, उर्वशीराजे मोहिते-पाटील, मेनकाराजे फाळके, नागपूरचे मानसिंगराजे भोसले, रणजीत देशमुख, हरियाणा येथील अजितसिंग नंदल, पंजाब येथील सुखवजींदर सिद्धू, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड, कोल्हापूरचे युद्धवीरसिंग गायकवाड, फलटण येथील विश्वजितराजे नाईक निंबाळकर पुणे येथील रोहन मोरे, मंदार फणसे उपस्थित होते.

अकलूज येथे नुखरे आणि मारवाड या जातीच्या अश्वांचे प्रदर्शन व स्पर्धा आयोजित केली होती. मारवाड जातीच्या घोड्यांमध्ये आदत नर, आदत मादी, दोन दात नर, दोन दात मादी, प्रजनन योग्य नर व प्रजनन योग्य मादी अशा सहा फेऱ्या घेण्यात आल्या तर नुखरे जातीच्या अश्वांमध्ये प्रजनन योग्य




नर व प्रजनन योग्य मादी अशा २ फेऱ्या घेण्यात आल्या अशा एकूण ८ फेऱ्या घेण्यात आल्या या आठही फेऱ्यांमधील प्रत्येक फेरीतील ५ क्रमांक काढण्यात आले

उपस्थित मान्यवरांचा सन्मान महाराष्ट्र राज्य जनसेवा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी लातूर ग्रामीणचे आ. धीरज देशमुख, हरियाणाचे अजितसिंग नंदल व पंजाब येथील सुखजींदर सिद्धू यांनीही मनोगत व्यक्त केले तर बारामती येथील रणजितअण्णा पवार, डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील व आ. धीरज देशमुख यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात स्थापन झालेल्या आयएचओए या समितीच्या पदाधिकाऱ्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला.

## आसरा रेल्वे ब्रिजखाली एकाची आत्महत्या

सुराज्य/सोलापूर : शुक्रवार दि. ४ नोव्हेंबर २०२२ रोजी सकाळी १० च्या सुमारास एका अनोळखी व्यक्तिंने आसरा रेल्वे ब्रिजखाली पॅसेंजर रेल्वे समोर येऊन आत्महत्या केली आहे.रेल्वेखाली आल्याने त्या इसमाचा मृतदेह छिन्नविच्छिन्न अवस्थेत आढळून आल्याने ओळख पटणे कठीण झाले होते. त्यानंतर म्बुलन्स चालक लादेन यांनी तो मृतदेह सिव्हील हॉस्पिटल येथे नेला. त्यानंतर त्या मयताची ओळख पटवण्याचे काम पोलिसांकडून सुरू असतानाच त्यांचे नातेवाईक सिव्हील हॉस्पिटलमध्ये दाखल झाले आणि त्या मरण पावलेल्या इसमाची ओळख पटली. त्यांचे नाव यादगिर नारायण बासुतकर (वय अंदाजे ५५ ते ६० रा. दाजी पेठ सोलापूर) असे आहे.

# मध्यावधीसाठी तयारीला लागा

## उद्धव ठाकरेंचे आदेश



सुराज्य/मुंबई

**राज्यात मध्यावधी निवडणुका लागण्याची शक्यता असल्याचे भाकीत शिवसेने नेते उद्धव ठाकरे यांनी संपर्क प्रमुखांच्या बैठकीत केले आहे. यावेळी त्यांनी कार्यकर्ते आणि नेत्यांना निवडणुकीच्या तयारीला लागण्याचे आदेशही दिले आहेत. शिवसेना नेत्या मनिषा कायंदे यांनी याबाबत माहिती दिली आहे. दरम्यान उद्धव ठाकरेंच्या या वक्तव्यामुळे राजकीय चर्चांना उधाण आले आहे.**

शनिवारी दादर येथील शिवसेना भवनात उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व संपर्कप्रमुखांची बैठक पार पडली. या बैठकीत उद्धव ठाकरेंनी कार्यकर्त्यांना तयारीला लागा, मध्यावधी निवडणुका कधीही लागू शकतात, कार्यकर्त्यांपर्यंत जा, असे आदेश दिले आहेत.

दरम्यान राज्यातील राजकीय परिस्थिती अस्थिर आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही मोठ मोठ्या घोषणा करायला सुरुवात केली आहे. राज्यात कधीही मध्यावधी निवडणुका लागतील. आपल्याला प्रत्येकाच्या घराघरात पोहचला हवे, आपला मुख्यमंत्री असताना केलेले काम घराघरात पोहोचवा, राज्यात मध्यावधी निवडणुका लागतील, त्याला तयार राहा अशी सुचना उद्धव ठाकरे यांनी विधानसभा संपर्कप्रमुखांना दिल्या आहेत.

मनिषा कायंदे म्हणाल्या की, 'शिवसेनेची



पहिल्यापासूनची बांधणी अशी आहे की, मुंबईतील जे पदाधिकारी आहेत त्यांना जे पक्षाचे महत्वाचे निरोप असतात ते संपर्क प्रमुखांना पाठवले जातात. त्यानुसार आजची बैठक होती. पंतप्रधान मोदींनी महाराष्ट्रासाठी काही खास पॅकेज जाहीर केले आहे, यामुळे महाराष्ट्रात मध्यावती निवडणूक जाहीर होण्याची शक्यता उद्धव ठाकरेंनी वर्तवली आहे. कायम महाराष्ट्र-गुजरात असा वाद निर्माण करुन भाजपकडून मतांचे राजकारण केले जात आहे, असा आरोपही कायंदे यांनी केला आहे.

यावर शिंदे गटाचे प्रवक्ते नरेश म्हस्के म्हणाले की, 'एकंदरीत परिस्थिती पाहता उद्धव ठाकरेंनी पक्षाचा आढावा घेण्याचे काम सुरु केले आहे. पण आता जनतेत जाऊन काम करणारे नेते पक्षात राहिले नाहीत, हे लक्षात आल्याने राहिलेले नेतेही जाण्याच्या वाटेवर आहेत. त्यामुळेच पक्षाला जोडून ठेवण्यासाठी उद्धव ठाकरेंनी मध्यावधी निवडणुकांबाबत वक्तव्य केले आहे. हे अस्थिर सरकार आहे, टिकणार नाही अशा अफवा सुरु आहेत. उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेतील १५ आमदारांपैकी अनेकजण आमच्या संपर्कात आहेत, असा दावाही यावेळी म्हस्के यांनी केला.



## मुंबईतील फॅशन स्ट्रीटला भीषण आग

सुराज्य/मुंबई

मुंबईतील चर्चगेटमधील प्रसिद्ध फॅशन स्ट्रीटला शनिवारी भीषण आग लागली होती. या आगीत जवळपास १५ ते २० दुकाने जळून खाक झाली आहेत. या आगाची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या ६ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. या आगीत दुकानांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. प्राथमिक माहितीनुसार, ही आग शॉर्ट सर्किटमुळे लागल्याचा अंदाज वर्तवला जात आहे, आता ही आग आटोक्यात आली आहे, मात्र १५ ते २० दुकाने पूर्णपणे जळून खाक झाली आहेत.

---

# राष्ट्रवादीच्या शिबिराला अमोल कोल्हेंची दांडी

सुराज्य/पुणे

**अहमदनगर जिल्ह्यातील शिर्डी येथे राष्ट्रवादीचे अधिवेशन पार पडले. दोन दिवसीय शिबिराला राज्यभरातील राष्ट्रवादीचे सर्व दिग्गज नेते उपस्थित होते. या अधिवेशनाला सर्व कार्यकर्ते देखील मोठ्या संख्येने सहभागी झाले. मात्र या अधिवेशनाला राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे अनुपस्थित राहिल्याने सर्वत्र चर्चा सुरु झाली आहे. अमोल कोल्हे नाराज असल्याच्या चर्चा आता सुरु झाल्या आहेत.**

शिरूर लोकसभा मतदारसंघाचे नेतृत्व



अमोल कोल्हे करतात. मात्र कोल्हे गेल्या काही दिवसांपासून मतदारसंघात देखील दिसत नसल्याचे बोलले जाते. आता ते राष्ट्रवादीच्या महत्त्वाच्या अधिवेशनाला देखील उपस्थित नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

नुकताच त्यांचा गरुड झेप नावाचा चित्रपट देखील प्रदर्शित झाला आहे. मात्र काही दिवसांपासून ते मतदारसंघाच्या कार्यक्रमांना देखील उपस्थिती लावत नसल्याचे दिसून आले आहे. तसेच शिर्डीत राष्ट्रवादीच्या अधिवेशनाला न आल्याने ते नाराज असल्याच्या चर्चा आता सुरू झाल्या आहेत. दरम्यान, वैयक्तिक कारणामुळे ते अधिवेशला उपस्थित राहू शकत नसल्याचे माहिती त्यांच्या निकटवर्तीयांकडून देण्यात आली आहे. शस्त्रक्रियेमुळे अधिवेशला अनुपस्थित राहिल्याची माहिती मिळत आहे.

## कॉंग्रेसचे २२ आमदार फुटण्याच्या तयारीत

सुराज्य/मुंबई : राज्यातील सत्तासंघर्षात सुंदोपसुंदी सुरू असतानाच आता शिवसेनेचे नेते आणि माजी खासदार चंद्रकांत खैरेंनी मोठा गौप्यस्फोट केलाय.

शिंदे-फडणवीस सरकार पडणार म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी कॉंग्रेसचे २२ आमदार तयार ठेवल्याचे सांगत चंद्रकांत खैरेंनी बार उडवून दिलाय. चंद्रकांत खैरेंच्या वक्तव्यानंतर पुन्हा एकदा राज्यातील राजकारण ढवळून निघालेय. राज्यातील शिंदे सरकारचा हा संघर्ष सर्वोच्च न्यायालयात आहे. त्यावर तारीख पे तारीख मिळत असतानाच चंद्रकांत खैरेंच्या दाव्याने नव्याच वादाला फोडणी मिळाली आहे.

## ठाण्यात सापडला १०० किलो वजनाचा पाकट मासा



सुराज्य/ठाणेः भाईंदर येथे उत्तन भाटेबंदर समुद्र किनाऱ्यावर तब्बल शंभर किलो वजनाचा पाकट मासा सापडला आहे. दोन कोळी बांधवांच्या जाळ्यात हा मासा सापडला आहे.

वाघ्या पाकट नावाचा हा मासा समुद्रात क्वचितच सापडतो. हा मासा आता भाईंदरच्या उत्तन येथील भाटेबंदर समुद्र किनाऱ्यावर आढळल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भाटेबंदर किनाऱ्यावर सुनील यांची एकवीरा आई ही लहानशी बोट आहे. या बोटीच्या सहाय्याने ते समुद्र किनारी चिखलात मासेमारी करतात. नेहमी त्यांना तिथे शिवंडा मासा मिळतो. पण अचानक त्यांच्या जाळ्यात पाकड मासा लागला आहे. या माशाला बाजारात खूप मागणी आहे त्यामुळं अचानक पाकट मासा गळाला लागल्याने दोन्ही कोळी बांधवांना आश्चर्याचा धक्का बसला आहे.

सुनील यांना सापडलेल्या माशाचे वजन तब्बल १०० किलोंचे आहे. मुंबईच्या बाजारात व्यापाऱ्यांना तो विकला तर त्याची किंमत आम्हांला १५,००० हजार रुपये एवढी मिळू शकते. तसेच, या माशाचे आरोग्यासाठी अनेक फायदे आहेत. त्यामुळे त्याला अधिक मागणी आहे, असे सुनील यांनी म्हटले आहे.

## 'बारामतीत माझीच दादागिरी चालणार'

### 'माझ्याशी पंगा घेणारा...' गोळीबार प्रकरणात धक्कादायक माहिती उघड

सुराज्य/बारामती



शहरातील गणेश जाधव या तरुणावर गोळीबार केल्याप्रकरणी बारामती तालुका पोलिसांनी शुभम राजपुरे व तुषार भोसले यांच्यासह ८ अनोळखी तरुणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. रस्ता ओलांडताना दुचाकी घासून नेल्याच्या वादातून शुक्रवारी एमआयडीसी परिसरातील रिलायन्स पेट्रोल पंपावर गोळीबाराचा प्रकार घडला होता. या प्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात ऋत्विक जीवन मुळीक (वय २१, रा. कुंभरकरवस्ती, वंजारवाडी, ता. बारामती) यांनी फिर्याद दिली.

गोळीबार प्रकरणी गुन्हा दाखल झालेल्या शुभम राजपुरे याने 'तू कोण आमच्यावर दादागिरी दाखवणारा, बारामतीत माझीच दादागिरी चालणार, माझ्याशी पंगा घेणारा बारामतीत पैदा व्हायचा आहे,' असे म्हणत पिस्तुलातून गणेश जाधव याच्या दिशेने दोनदा फायरिंग केले. दुसऱ्या वेळी केलेल्या फायरिंगमध्ये एक गोळी गणेशच्या छातीला लागली होती.



## राज्यात आता 'नवे सहाय्यक' आयुक्त

### १७५ वरिष्ठ निरीक्षकांना मिळणार पदोन्नती

सुराज्य/नाशिक

राज्यभरात पोलीस दलातील विविध विभागांत २६४ सहाय्यक आयुक्त तथा उपअधीक्षकांची पदे रिक्त आहेत. तर, प्रलंबित कामे आणि रखडलेल्या कार्यवाहीमुळे ३० हून जास्त वर्षे सेवा बजावूनही राज्यातील किमान दोनशे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदोन्नतीच्या प्रतिक्षेत आहेत. त्यांपैकी १७५ निरीक्षकांची पदोन्नतीने बदली करण्यात येणार आहे. ही प्रक्रिया सुरू झाली असून, लवकरच राज्यात 'नवे सहाय्यक आयुक्त' नियुक्त होणार आहेत.

पोलीस यंत्रणेत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांची कमतरता असल्याची ओरड सातत्याने होत असून, काही ठिकाणी सहाय्यक आयुक्तांसह उपायुक्तांची पदे रिक्त आहेत. त्यानुसार पाठपुरावा केल्यानंतर गृहविभागातर्फे कार्यवाहीला सुरुवात झाली आहे.

पोलीस दलाच्या आस्थापना विभागाचे अपर पोलीस महासंचालक संजीव कुमार सिंघल यांनी पोलीस निरीक्षकांची सेवाज्येष्ठता यादी जाहिर केली आहे. या १७५ निरीक्षकांमध्ये नाशिक आयुक्तालयातील आठ तर, ग्रामीण, एमपीए आणि सीआयडीसहीत इतर विभागाच्या प्रत्येकी दोन निरीक्षकांची नावे आहेत. या सर्व निरीक्षकांना लेखी स्वरुपात महसूल संवर्गाच्या पसंतीचे अर्ज ७ नोव्हेंबरपर्यंत हे सादर करायचे आहेत. त्यानंतर नाशिक, कोकण-१, कोकण-२, पुणे, नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद यापैकी एका महसूल संवर्गात या अधिकाऱ्यांची पदोन्नतीने बदली होईल.

चार ते पाच वर्षांपासून अडीचशे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना पदोन्नती मिळालेली नाही. तर, खात्यांतर्गत कार्यमूल्यांकन, वरिष्ठ श्रेणी सूची, कागदपत्रांची पूर्तता, अंतर्गत चौकशीसह रखडलेल्या मंत्रालयीन कामांचा फटका पदोन्नतीला बसत आहे. शिवाय, सहाय्यक आयुक्त ते उपायुक्त या पदोन्नतीही न झाल्याने पोलीस निरीक्षकांच्या बढतीचा राज्यभरात खोळंबा झाला आहे. आता प्रक्रिया सुरू झाल्याने राज्यात बढतीप्राप्त सहाय्यक आयुक्त नियुक्त होण्याची चिन्हे आहेत.

## न्या. उदय लळीत यांचा राजभवनात सत्कार

सुराज्य/मुंबई : मुंबईतील राजभन येथे सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश उद्या लळीत यांचा सत्कार समारंभ सोहळा झाला.



त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राज्यपाल भगतसिंह कोश्यारी उपस्थित होते.

राजभवनातील दरबार हॉलमध्ये सरन्यायाधीशांच्या सत्कार समारंभ झाला राज्याचे राजपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते उदय लळीत यांचा सत्कार करण्यात आला.

## धोनीची मद्रास हायकोर्टात धाव

सुराज्य/चेन्नई

**भारताचा माजी कर्णधार महेंद्र सिंग धोनीने मद्रास उच्च न्यायालयामध्ये पोलीस अधिकारी जी. संपत कुमार यांच्याविरोधातील खटल्यात दाद मागितली आहे. या आयपीएस अधिकाऱ्याविरोधात न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी खटला चालवावा असं धोनीने म्हटलं आहे. सर्वोच्च न्यायालयासंदर्भात संपत यांनी केलेल्या विधानांच्या आधारे धोनीने ही मागणी केली आहे.**

भारतीय क्रिकेट इतिहासातील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक असलेल्या धोनीने २०१४ साली संपत यांच्याविरोधात खटला दाखल केला होता. त्यावेळेस संपत हे इनस्पेक्टर जनरल ऑफ पोलीस पदावर कार्यरत होते. मॅच-फिक्सिंगसंदर्भात




संपत यांच्याकडून केल्या जाणाऱ्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर धोनीने न्यायालयामध्ये धाव घेतली होती. संतप यांनी आपल्याविरोधात अशी कोणतीही विधाने करु नयेत, असे निर्देश न्यायालयाने द्यावेत अशी धोनीची मागणी होती. तसेच झालेल्या अब्रूनुकसानीचा मोबदला म्हणून १०० कोटी रुपयांची नुकसानभरपाई द्यावी अशीही मागणी धोनीने केली होती.

न्यायालयाने या पोलीस अधिकाऱ्याला धोनीविरोधात विधाने न करण्याचे निर्देश दिले होते. आयपीएलमध्ये झालेल्या मॅच-फिक्सिंग प्रकरणानंतर या गोष्टी घडल्या होत्या.

## नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ; संपत्ती जप्त करण्यास मान्यता

सुराज्य/मुंबई

मनी लॉंड्रिंग प्रकरणी अटकेत असलेल्या राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि राज्याचे माजी मंत्री नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. नवाब मलिक यांची संपत्ती जप्त करण्यास ईडीला (ED) परवानगी मिळाली आहे. यामध्ये मुंबईतील गोवावाला कंपाऊंडमधील जमिनीचा एक भाग, कुर्ला पश्चिमेला तीन फ्लॅट, वांद्रे पश्चिम येथील दोन फ्लॅट आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील १४७ एकर शेतजमिनीचा समावेश आहे.

फरार अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिम याची दिवंगत बहीण हसना पारकरशी संबंधित मनी लॉंड्रिंग प्रकरणात ईडीने कारवाई करत फेब्रुवारी महिन्यामध्ये नवाब मलिक यांना अटक केली होती. नवाब मलिक सध्या न्यायलयीन कोठडीत असून खासगी रुग्णालयात उपचार घेत आहेत.

## वाचन बरोबर होतेय का?

### शरद पवारांचे निरीक्षण

सुराज्य/अहमदनगर

**राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे लिखित भाषण पक्षाचे नेते दिलीप वळसे-पाटील यांनी वाचून दाखविले. यानंतर राष्ट्रवादीच्या दोन दिवसीय मंथन शिबिराचा समारोप झाला. आजारपणामुळे सुरुवातीच्या चार-पाच मिनिटे पवार यांनी भाषण केले. उरलेले भाषण वळसे-पाटील यांनी वाचून दाखविले. मात्र, यावेळी शरद पवार कागद हातात घेऊन वळसे-पाटील बरोबर वाचत आहेत का, यावर लक्ष ठेवून असल्याचे दिसत होते.**

शुक्रवारपासून उत्तम शिबिर चालू आहे, अन्य मार्गाने शुक्रवारचे भाषण मुंबईत बसून ऐकत होतो. जयंत पाटील आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तम प्रकारे कार्यकर्त्यांना वैचारिक शक्ती देणारे आयोजन केले. हे सुरू असताना जयंत पाटील यांच्याकडून माहिती



मिळत होती. राज्यातील युवक, महिला, आदिवासी, दलित आणि भटके विमुक्त समाजातील कार्यकर्ते यांची शिबिराला येण्याची इच्छा होती. मी सगळ्यांची भाषण ऐकली असे नाही, मात्र, काही जणांची भाषण ऐकली. मला सविस्तर बोलणे आज शक्य नाही. पुढील १० ते १५ दिवसांनंतर नेहमीचे काम सुरू करता येईल. या शिबिरातून नवा संदेश जात आहे. राष्ट्रवादीचा लहान थोर कार्यकर्ता पूर्ण ताकदीने हा पक्ष मजबूत करतील, असा विश्वास शरद पवार यांनी व्यक्त केला.

## पर्यायच उरला नसल्याने नोकर कपात : मस्क



सुराज्य/नवी दिल्ली

आंतरराष्ट्रीय उद्योग क्षेत्रातील सर्वात मोठ्या व्यवहारांपैकी एक ठरलेला ट्विटर खरेदीचा व्यवहार नुकताच पार पडला.

टेस्लाचे प्रमुख एलॉन मस्क यांनी तब्बल ४४ अब्ज डॉलर्सला ट्विटरची खरेदी केली. या घडामोडींमुळे बाह्य विश्वासोबतच ट्विटरमधील कर्मचारी मंडळीही संभ्रमात आली होती.

नव्या मालकीनंतर आता कंपनीत काय बदल होणार? याविषयी उत्सुकता आणि भीती अशा दोन्ही भावना कर्मचाऱ्यांच्या मनात होत्या. अखेर उत्सुकतेपेक्षा कर्मचाऱ्यांची भीतीच खरी ठरली. एका झटक्यात एलॉन मस्क यांनी जवळपास ५० टक्के ट्विटर कर्मचाऱ्यांना नोकरीवरून काढून घरी पाठवले. त्यावरून सध्या जोरदार चर्चा सुरू असून ट्विटरबाबत जाहिरातदारांमध्येही संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

या पार्श्वभूमीवर खुद्द एलॉन मस्क यांनी ट्वीट करून यासंदर्भात स्पष्टीकरण दिले आहे.

# महिन्याला पाच लाखांची हेराफेरी?

## महिला लिपिकाचा नऊ वर्षांपासूनचा गोरखधंदा

सुराज्य/नागपूर

**मृत कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वेतन लाटणाऱ्या महिला लिपिकाचे प्रताप आता हळूहळू बाहेर येऊ लागले आहेत. ही महिला २०१३पासून एकाच ठिकाणी एकाच पदावर कार्यरत होती. ती महिन्याला ५ लाख रुपयांची हेराफेरी करीत असल्याचे प्राथमिक चौकशीत समोर आले आहे. त्यामुळे तिने गेल्या काही वर्षांत कोट्यवधींचा घोटाळा केला असावा, अशी दाट शक्यता वर्तविली जात आहे.**

### दीड वर्षापासून सुट्टीवर

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला लिपिक सरिता नेवारे मे २०२१पासून सुट्ट्यांवर गेली आहे. यादरम्यानच्या काळात तिला कोरोनाची बाधाही झाल्याचे सांगितले जात आहे. तिच्या सुट्ट्यांचीही विभागीय चौकशी सुरू असल्याची माहिती जिल्हा परिषदेतील प्रशासकीय सूत्रांनी दिली.

सरिता नेवारे असे या महिला लिपिकाचे नाव असून ती पारशिवनी पंचायत समिती येथे कार्यरत होती. समिती स्तरावरून सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांच्या निवृत्तीवेतनात अफरातफर केल्याचा आरोप तिच्यावर आहे. मृत व्यक्तींचे सेवानिवृत्ती वेतन कायम ठेवत ते आपले कुटुंबीय, नातेवाईक व परिचितांच्या नावावर वळते करण्याचा गोरखधंदा ती करीत असल्याचे

### तपासणी सुरू

समोर आले आहे. तिच्याकडे २०१३पासून सेवानिवृत्ती वेतनाची जबाबदारी होती. या पंचायत समितीअंतर्गत १९०वर सेवानिवृत्त शिक्षक आहेत.

मार्च २०२२मध्ये पंचायत समिती स्तरावर सर्व सेवानिवृत्तांच्या हयातीचे दाखले तपासले असता तेव्हा सुमारे तीसहून अधिक दाखले आले नव्हते. पुढे काही दिवसांत यातील काहींचे




दाखले आले तर १८ ते २० जणांचे दाखले आले नाहीत. येथून हे प्रकरण उघडकीस आल्याचे सांगितले जात आहे. त्यांच्या बँक खात्यांची माहिती घेतल्यास त्या व्यक्तींचे मोबाइल क्रमांक व पत्ते हाती लागले.

संपर्क साधला असता ज्या खात्यात रक्कम वळती होत होती, ते भलतेच लोक असल्याचे निदर्शनास आले. सहा विविध बँकांमध्ये ही खाती असल्याचे कळते. मुख्य कार्यकारी अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी नेमलेल्या चौकशी समितीकडून कागदपत्रांची तपासणी सुरू करण्यात आली आहे.




काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# तुमच्या संग मला येऊ द्या की रं... देवाचं दर्शन घेऊ द्या की...

डी. एस. गायकवाड

**अनगरकर आणि माढेकर तसे जिल्ह्यातील बडे राजकीय प्रस्थ. . पण अलीकडील काळात अवघा सोलापूर जिल्हा भाजपामय होत असताना त्याकडे हे दोन्हीही घराणे आकर्षिले जात असल्याचे पहावयास मिळत आहे आपले जिल्ह्यातील जुने बडे राजकीय सहकारी भाजपात डेरे दाखल असल्याने भविष्यात उज्वल राजकीय परंपरा जपण्यासाठी तुमच्या संग मला येऊ द्या की र. . देवा (देवेंद्र) फडणवीस दर्शन घेऊ द्या की. . अशी अवस्था अनगरकर आणि माढेकरांची झालेली दिसत आहे.**

सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणात आठ आमदार आणि दोन खासदार असल्याने भाजपाने आपले निर्विवाद वर्चस्व निर्माण केले आहे. फक्त मोहोळ आणि माढा या दोनच ठिकाणी राष्ट्रवादीचे अधिकृत आमदार कार्यरत असल्याचे दिसते दिवसेंदिवस राष्ट्रवादीची जिल्ह्यातील ताकद देखील क्षीण होताना दिसते आहे त्यातच राज्यात सत्तांतर झाल्याने पुन्हा एकदा भाजपाला बळ प्राप्त झाले आहे. त्यामुळे भविष्यात राजकीय अडचणींचा सामना करावा लागेल आणि त्यातून होणाऱ्या खच्चीकरणामुळे राजकीय अस्तित्व धोक्यात येईल या विचारापोटी अनगरकर आणि माढेकरांनी सोलापूर जिल्ह्याचे प्रभारी म्हणून काम पाहत असलेले राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क मोहीम सुरू केलेली दिसते आहे. या संपर्क मोहिमेचा दुसरा तिसरा टप्पा पार पडलेला असला तरी अद्याप पडद्यामागे काहीतरी शिजतंय अशी शंका येण्यास वाव मिळताना दिसत आहे.

जिल्ह्यात देखील सातत्याने अनगरकर - माढेकरांच्या भाजपा पक्ष प्रवेशाच्या चर्चा घडताना दिसत आहेत. मध्यंतरीच्या काळात माजी आमदार राजन पाटील आणि आमदार बबनदादा शिंदे यांनी वरिष्ठ भाजपा नेतृत्वाच्या भेटीगाठी घेतल्याचे समोर आले होते तर नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात माजी आमदार राजन पाटील यांनी आमचेही भाजपामध्ये ऐकणारे कोणीतरी आहेत, असे आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मंत्रिमंडळाच्या समावेशाबाबत वक्तव्य केले होते. यानंतर कार्तिकीला आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आमदार बबनदादा शिंदे यांनी भेट घेतली. ही भेट देखील संपूर्ण सोलापूर जिल्ह्याच्या राजकीय वातावरणात चर्चेचा विषय ठरली आहे. यावरून आता या दोन्ही नेत्यांचा राष्ट्रवादीवर भरोसा राहिलेला दिसत नाही. त्यामुळे भविष्यात त्यांचे भाजपा प्रवेश झाले तर नवल वाटायला नको. पण जिल्ह्याची सध्याची राजकीय परिस्थिती पाहिली तर जिल्ह्यातील बहुतांश बडे नेते भाजपात तळ ठोकून आहेत आणि मागील दहा-पंधरा वर्षात जे आपापसात राजकीय शहकटशहाचे राजकारण झाले त्यावरून देखील त्यांना पक्षप्रवेश देताना जुना इतिहास हेवेदावे याचा बारकाईने विचार करूनच निर्णय भाजपाला घ्यावा लागणार आहे.

मोहिते पाटील, परिचारक, सोलापूरचे देशमुख, मंगळवेढ्याचे आवताडे, बार्शीचे राऊत अशी बडी मंडळी भाजपात सक्रियपणे कार्य करताना दिसत आहेत. याशिवाय जिल्ह्यातील छोटेमोठे गट देखील देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपासाठी जीवाचे रान करताना दिसत आहेत. त्यामुळे भविष्यात आपणही त्यात असले पाहिजे आणि टिकाऊ राजकारण केले पाहिजे अशीच भूमिका घेऊन माजी आमदार राजन पाटील आणि आमदार बबनदादा शिंदे यांची वाटचाल सुरू असलेली दिसत आहे.



**‘मुका घ्या मुका’ची आठवण**

**स्व. दादा कोंडके निर्मित १९८७ साली रिलीज झालेला मुका घ्या मुका हा चित्रपट त्याकाळी खूप गाजला होता. त्यातील तुमच्या संग मला येऊ द्या की. . रं. . देवाचं दर्शन घेऊ द्या की. . या गीताने रसिक प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले होते. आजही हे गीत अगदी आवडीने ऐकावेसे वाटते. राष्ट्रवादीत राहून पिछाडीवर राहण्यापेक्षा भाजपामध्ये जाऊन अग्रेसिव्ह राहण्याच्या भूमिकेत सध्या आमदार बबनदादा शिंदे व माजी आमदार राजन पाटील दिसत आहेत. म्हणूनच या गीतपंक्ती यानिमित्ताने राजकीय प्रासंगिक परिस्थिती म्हणून पुन्हा एकदा ओठावर तरळू लागल्या आहेत.**

# बाळासाहेबांच्या शिवसेनेला मिळतेय चांगले बळ

दीपक शेळके

राज्यामध्ये शिंदे - फडणवीस सरकार स्थापन झाल्यानंतर शिवसेना नेमकी कोणाची हा वाद आता कोर्टात गेला आहे. आमचीच शिवसेना खरी असल्याचा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गट आणि पक्षप्रमुख उद्धव ठाकरे गट करत आहे. दोन गटांमध्ये सत्तासंघर्ष पेटला असताना सोलापुरात मात्र बाळसाहेबाच्या शिवसेनेला मोठा जनाधार मिळत आहे. शिंदे गटात होणाऱ्या पक्षप्रवेशामुळे सध्या जिल्हातील राजकीय वातावरण तापू लागले आहे. यातून सोलापूर शहर जिल्हातील उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना आणि बाळासाहेबांची शिवसेना पदाधिकारी यांच्यातील वाद विकोपाला जाण्याची शक्यता आहे. त्याची पहिली ठिणगी शिंदे - बरडे यांच्या यांच्या वादावरून पडली आहे.




मुख्यमंत्री शिंदे यांच्या हाती सत्ता असल्याने मोठ्या प्रमाणात शिंदे गटात इनकमिंग सुरू आहे. परिणामी शहर जिल्हातील जुन्या आणि नव्या शिवसेना पदाधिकाऱ्यांमध्ये सत्तासंघर्ष विकोपाला जाण्याची शक्यता आहे. एकेकाळी जिल्ह्यात शिवसेनेची ताकद मोठी होती. उत्तमप्रकाश खंदारे, रतिकांत पाटील, राजा राऊत, जयंवतराव जगताप असे शिवसेनेचे चार आमदार होते तर जिल्हा परिषद, पंचायत समितीत शिवसेनेचे सदस्य होते. शिवसेनेचे दीपक गायकवाड यांनी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपद भोगले त्यानंतर राजकीय समिकरणे बदल्यानंतर शिवसेनेची ताकद कमी कमी होत गेली. राज्यातील शिवसेनेत देखील उभी फूट पडली. त्यांचे पडसाद राज्यात देखील उमटले आहेत. याला सोलापूर जिल्हा देखील अपवाद कसा असेल?

राज्यात शिंदे - फडणवीस यांच्या रूपाने राज्यात सरकार असल्याने ठाकरे गटातील काहीजण शिंदे गटात दाखल होत आहेत. सांगोल्याचे आ. शहाजी पाटील हे गुवाहाटी दौऱ्यामुळे राज्यात फेमस झाले असल्याने त्यांचा दबदबा वाढला आहे. आतातर त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पंढरपूर दौऱ्याच्यावेळी राष्ट्रवादीचे बारा आमदार शिंदे गटाच्या गळाला लागले असल्याचे ते लवकरच शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे विधान करत खळबळ माजवली आहे. आरोग्यमंत्री असलेल्या प्रा. डॉ. तानाजी सावंत यांचे बंधू प्रा शिवाजी सावंत हे मात्र शिंदे गटाच्या वाढीसाठी सातत्याने प्रयत्न करताना आहेत. त्यांच्या समवेत अमोल शिंदे, मनीष काजळे, मंगेश चिवटे, महेश चिवटे, हरीभाऊ चौगुले, तुकाराम मस्के शहरात गट मजबुतीसाठी झटताना दिसत आहे.

बार्शीचे शिवसेना नेते भाऊसाहेब आंधळकर यांनी थेट उद्धव ठाकरे यांच्यावर आरोप करत शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यामुळे बार्शीमध्ये देखील आता शिंदे गट सक्रिय होताना दिसत आहे. अक्कलकोटचे तालुकाप्रमुख संजय देशमुख, शहर प्रमुख योगेश पवार हे पदाधिकाऱ्यांसह शिंदे गटात दाखल झाले आहेत. त्यामुळे बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, तालुक्यात शिंदे गटाची ताकद वाढू लागली आहे. माजी उपमहापौर दिलीप कोल्हे यांनीही हातातील घड्याळ काढत शिंदे गटात प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबईत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत प्रवेश करणार असल्याचे कोल्हे यांनी जाहीर केले आहे. एकीकडे राष्ट्रवादीचे चिंतन शिबिर चालू असताना सोलापुरातील महिला अघाडीला घरघर लागली आहे. आरोग्यमंत्री तानाजी सावंत यांच्या उपस्थितीत महिला पदाधिकाऱ्यांनी शिंदे गटाचा झेंडा हाती घेतला आहे. तर राष्ट्रवादीमधील अनेक नेते शिंदे गटाच्या वाटेवर असल्याचे बोलेले जात आहे.

**फळ मिळणार का?**

राज्यात संत्तांतर झाले की- सत्तेचा फायदा घेण्यासाठी पक्षबदलाची स्पर्धा सुरू होते. अनेकजण सत्ताधाऱ्यांचा आश्रय घेतात. तशी पक्ष बदलाची स्पर्धा लागते आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही नेते शिंदे गटाच्या हाताला लागले असले तरी पक्ष बदलाचे फलित त्यांना मिळणार का हे भविष्काळ ठरवेल मात्र शहर जिल्हातील बदलती राजकीय समिकरणे पाहता बाळासाहेबांच्या शिवसेनेला चांगल बळ मिळतेय हे नक्की.

# कोंडी गटात बापू आणि मालकांचा प्लॅन ठरला

विष्णू सुरवसे

जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुका अजून जाहीर झाल्या नाहीत पण लवकरच होतील, असा अंदाज उत्तर तहसीलदार प्रशासनाच्या वतीने केला जात आहे. शासनाच्या नियमानुसार वाढीव गट व गण कायम राहतील, असाही अंदाज व्यक्त केला जात आहे. उत्तर तालुक्यातील कोंडी गटातून दक्षिणचे आमदार सुभाष देशमुख यांचे सुपुत्र मनीष (भैय्या) देशमुख किंवा बापूंचे एकनिष्ठ तिऱ्हे येथील कार्यकर्ता राम (काका) जाधव दोघांपैकी एकाला बापू संधी नक्कीच देणार असल्याचे कोंडी गट व तिऱ्हे गणातून बोलले जात आहे. बापूंसोबत काकांनी अनेकवेळा दिल्लीवारीही केली असल्याने राम राज्य स्थापना करण्यासाठी प्रोत्साहन देतील?अशीही चर्चा रंगली आहे.

कोंडी गटात व गणात एकूण १० ते १२ गावे येतात. गटाचे व गणाचे आरक्षण सर्व साधारण पुरुष व महिला असे आरक्षण निश्चित झाले आहे. शासनाच्या निर्देशानुसार आरक्षण कायम राहील. तिऱ्हे ग्रामपंचायतीवर माजी आमदार दिलीप माने यांचे वर्चस्व आहे. पृथ्वीराज माने युवा मंचचे पृथ्वीराज माने यांना कोंडी गटासाठी माजी आमदार दिलीप माने संधी देणार असल्याची युवा मंचाच्या कार्यकर्त्यांमध्ये चर्चा आहे. युवा मंचाचे काम जोरात चालू असून गाठी भेटी, उपस्थितीच्या माध्यमातून वातावरण निर्मिती केली जात आहे. राजकारणापासून चार हात लांब राहून अचानकपणे तिऱ्हे ग्रामपंचायत निवडणुकीत वादळ निर्माण करून एक हाती सत्ता रोखणारे राम (काका) जाधव यांना गटासाठी गणासाठी पाकणीचे सरपंच गुंडबापू नक्कीच संधी देणार का? असेही काकांच्या निकटवर्तीयाकडून बोलले जात आहे. शिवसेनेत फूट पडल्याने बाळासाहेबांची शिवसेनेचे तालुका प्रमुख सुधीर गोरे, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे संजय पौळ यांनी देखील आपण उमेदवार उभे करणार असल्याचे सांगितले. आजी माजी आमदार यांच्या लढाईत गट सामील होणार असल्याने कोंडी गटात व गणात आगामी निवडणूक नव्या वळणावर जाणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# विकासकामांचा लेखाजोखा आणि सभेचा धडाका

सचिन अपसिंगकर

**कार्तिकी एकादशी निमित्त पंढरीत विठुरायाच्या दर्शनाला आलेले राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्दादश क्षेत्र बार्शीत येवून भगवंताच्या दर्शनाचे पुण्यकर्म साधले. आमदार राजाभाऊ राऊत यांनी आयोजित केलेल्या या धडाकेबाज सभेत बार्शी तालुक्यातील प्रलंबित विकास कामांचा लेखाजोखा मांडण्यात आला. २०१९ साली राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाले तेव्हा या सरकारला अपक्ष आमदारांची गरज होतीच. पण त्यावेळेला अपक्ष आमदार म्हणून बार्शीतून निवडून आलेल्या राजाभाऊ राऊत यांनी भाजपाला समर्थन द्यायचे ठरवले आणि त्यांच्या निष्ठेचे फळ त्यांना आता देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाल्यानंतर मिळते आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.**

२०१७ साली राऊत यांनी भाजपात प्रवेश केला होता तेंव्हापासून त्यांनी भाजपाची साथ सोडलेली नाही. आता गेली ५ वर्षे ते भाजपा समर्थक आहेत. जर येत्या दोन वर्षात राज्यातील विद्यमान सरकारला काही धोका निर्माण झाला नाही तर आगामी २ वर्षे बार्शीला या सरकारकडून मोठे पाठबळ लाभेल, अशी शक्यता दिसत आहे. शुक्रवारच्या या सभेचे वैशिष्ट्य म्हणजे या सभेत कोणतेही पक्षीय किंवा खाजगी आरोप झाले नाहीत याउलट बार्शी तालुक्याच्या विकास कामांबाबत चांगले विचारमंथन झाले. या सभेत फडणवीस यांनी मुक्तहस्ताने राऊत यांचे कौतुक केले. फडणवीस यांनी शहरातील भुयारी गटार योजनेच्या बेगाणे झालेल्या कामापासून ते भगवंत स्टेडीयमपर्यंतच्या सर्व कामांचे गोडवे गायले. राऊत यांनीही या सभेत आजपर्यंत फडणवीस यांनी साठवण तलाव, बंधारे, सार्वजनिक रस्ते, उद्यान, उपसा सिंचन योजना, एम. आय. डी. सी याबाबत फडणवीस यांनी दिलेल्या निधीच्या पाठबळाची उजळणी केली.

या सभेत राऊत यांनी फडणवीस यांच्याकडून बार्शी तालुक्यातील जनतेच्या भविष्यासाठी महत्वाच्या असलेल्या उपसा सिंचन योजनाबाबतच्या अपेक्षा मांडल्या तसेच तीर्थक्षेत्र विकास निधी पासून ते बसस्थानक विस्तारीकरणापर्यंत अनेक नियोजित योजनांसाठी विकास निधीची मागणी केली. या सभेत राऊत यांनी त्यांच्या नेहमीच्या शैलीत आपल्या परंपरागत विरोधकांवर कसलीच टिपणी केली नाही याची मोठी चर्चा झाली. आगामी काळात जनता विकासालाच महत्व देणार आहे त्यामुळे नियोजनबध्द विकासाचा आराखडा मांडून काळाचे भान राऊत यांनी ओळखले आहे. राऊत यांनी केवळ बार्शीच्याच पाण्याचा प्रश्न मांडला नाही तर जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये असणारी सिंचनाची गरज याकडेही त्यांनी उपमुख्यमंत्र्याचे लक्ष वेधले. राऊत यांचे बार्शीबरोबरच जिल्ह्याच्या राजकारणाकडेही बारकाईने लक्ष आहे.



**किंगमेकरची भूमिका**

जिल्ह्याच्या अनेक महत्वाच्या सत्ता केंद्रावरील निवडणुकांमध्ये राऊत यांनी किंगमेकरची भूमिका बजावलेली आहे. याचेच निर्दशक त्यांच्या सभेतील व्यक्तव्यावरून आले. राऊत यांनी या सभेला जिल्ह्यातील सर्व भाजपा खासदार, जेष्ठ नेते व आमदारांनाही पाचारण केले होते. यावरूनच ते आता सर्वसमावेक्षक आणि गोळा बेरजेचे राजकारण करण्याच्या दृष्टीने पावले टाकत आहेत, हे लक्षात येते. त्यामुळेच गर्दीचा बार उडवून सभेचा धडाका लावत राऊत यांनी विकास कामांचा लेखाजोघा मांडला ही चांगली गोष्ट आहे.

# थंड्या बस्त्यातील ‘पार्टी’ला बाहेर कधी काढणार?

पुरुषोत्तम कुलकर्णी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा भाजपा नेते देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येवून गेले. राज्याच्या सत्तेत पुन्हा आल्यानंतर त्यांच्या पहिल्याच दौऱ्यात भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचा माहोल होता. सोलापूरच्या विमानतळावर शहरातील पदाधिकारी व मंगळवेढा आणि बार्शी गाठून जिल्ह्यातील पदाधिकारी त्यांना भेटून धन्य-धन्य झाले. महाविकास आघाडी सरकारला चिमटे घेत फडणवीस यांनी मंगळवेढ्यात एक लक्षवेधी विधान केले. महाविकास आघाडीचे सरकार असताना म. बसवेश्वर यांच्या स्मारकाचा १५१ कोटीचा प्रस्ताव थंड्या बस्त्यात गेला होता. मी पुन्हा आल्यानंतर तो त्या थंड्या बस्त्यातून बाहेर काढला, असे फडणवीस म्हणाले. वेळ पाहून खोपरखळी मारण्यात, हजरजबाबीपणा दाखवण्यात, कधी अमोघ तर कधी आक्रमक वक्तव्य करण्यात ते माहीर आहेतच. थंड्या बस्ता हा छानसा शब्दप्रयोग त्यांनी सोलापूरकरांना माहीत करून दिला, जो कुणाला फारसा परिचित नव्हताच.

राज्याला प्रगतीपथावर नेतानाच भारतीय जनता पार्टीलाही थंड्या बस्त्यातून बाहेर काढण्यासाठी फडणवीसांना कसरत करावी लागणार आहे. कारण घोडा मैदान जवळ येत आहे. दोन वर्षांनी भाजपाच्या अस्तित्वाचा प्रश्न ऐरणीवर येणार आहे. भाजपाचे संघटन विस्कळीत झाले आहे. राज्यातच पक्षाला ही कीड लागल्याने सोलापूर त्याला अपवाद कसे असू शकेल? शिस्तप्रिय पार्टी असलेल्या भाजपाची डिसिप्लीन काय असते हे आम्ही केवळ पाहिले आहे.

जिल्हास्तरावर भाजपाचा अध्यक्ष, शहरस्तरावर शहराध्यक्ष तर तालुकापातळीवर तालुकाध्यक्ष हे पार्टीचे ‘बिग बॉस’ असतात. पक्षाचा एखादा कार्यक्रम असेल किंवा मेळावा असेल तर अध्यक्षांच्या पुढे लोकप्रतिनिधी बसले पाहिजेत. इतकेच काय? मंत्री-संत्री जिल्ह्यात आला तरी त्याने अध्यक्षांचे ऐकले पाहिजे. हा प्रोटोकॉल(शिष्टाचार) आहे. काही वर्षांपूर्वी पक्षाच्या कार्यक्रमांमध्ये पदाधिकारी, लोकल बॉडीचे सदस्य संतरज्या टाकताना आम्ही पाहिले आहे. एखादा नेता आल्यानंतर पक्षाच्या कार्यकर्त्याकडे राहात असत. पण आज भाजपातील चित्र पार बदलले आहे. नेता ‘पंचतारांकित’ झाला आहे तर कार्यक्रम ‘थ्री स्टार’ होतायेत.

एकूणच सोलापूरच्या बाबतीत विचार केल्यास दोन खासदार, सात आमदार असा लोकप्रतिनिधींचा गोतावळा आहे. २०१४मध्ये भाजपा-शिवसेना युतीची सत्ता होती. त्यानंतर अडीच वर्षांचा आघाडीचा काळ सोडला तर आता शिंदे-भाजपाची सत्ता आली आहे. लोकप्रतिनिधींच्या गोतावळ्याने सोलापूरला काय दिले? हा खरा प्रश्न आहे. केंद्रात आठ वर्षांपासून भाजपाची सत्ता आहे. त्यात राज्यातील युतीची पाच वर्षांची सत्ता ॲड करता येईल. या साऱ्या सत्तेच्या काळात भाजपा नेत्यांनी, लोकप्रतिनिधींनी सोलापूरसाठी कोणता उद्योग आणला? कोणते नवीन प्रकल्प आणले? किती जणांना रोजगार दिला? या साऱ्या प्रश्नांवर आत्मचिंतन करून आगामी सर्वच निवडणुकांमध्ये सोलापूरकर डोळसपणे मतदान करतील, हे भाजपाच्या वरिष्ठ नेत्यांनी लक्षात ठेवले पाहिजे.

भाजपा व्यक्ती केंद्रीत झाली आहे. भाजपाच्या अध्यक्षांना साईड कॉर्नर करत लोकप्रतिनिधींची मनमानी वाढत चालली आहे. पक्ष संघटनेत बेदिली माजली आहे. लोकांकडून होणारी मागणी बासनात ठेवत आम्ही सांगतो तीच कामे व्हायला हवीत, अशी भाजपाच्या लोकप्रतिनिधींची हुकूमशाही बळावत चालली आहे. सोलापुरात भाजपाचे कार्यालय आहे, ते कोणासाठी? लोकांच्या भावना ऐकण्यासाठी की पदाधिकाऱ्यांना हवा खाण्यासाठी? ह्या कार्यालयात कधी जनता दरबार भरवलाय? कामे घेऊन येणाऱ्या लोकांना लोकप्रतिनिधींकडून शिफारशींची पत्रे मिळत नाहीत, अशी लोकांची तक्रार आहे. केवळ विकास कामांचे कागदी घोडे नाचवले जात आहेत.

**सारे प्रश्न वाऱ्यावरच**

जिल्ह्यात पिक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना मिळत नाहीय. अतिवृष्टीच्या मदतीचा थांगपत्ता नाही. पिक कर्जाची वेळेवर परतफेड करणाऱ्यांना अजूनही अनुदान मिळाले नाही. ग्रामीण भागात शेतरस्ते व गावरस्त्यांची अवस्था ७५ वर्षांनी देखील वाईट आहे. शेकडोंनी रस्ते नॉन प्लॅनमध्ये आहेत. त्यामुळे त्यांना निधी मिळत नाही. सरकारच्या प्लॅनमध्ये असे टाकण्याचे नियोजन आहे काय? डीपीसीचा निधी लोकप्रतिनिधींच्या इंटरेस्टवर खर्ची पडतो आहे, अशी जाणकारांची तक्रार आहेत. जिथे खरी गरज आहे, तिथे निधी मिळत नाही. याचे चिंतन कुणी करायचे?ग्रामीण भागात आरोग्य सेवेची प्रचंड ओरड आहे. दवाखान्यात डॉक्टर असला की औषध नसते, तर औषध असले की, डॉक्टर नसतात. अशी वाईट अवस्था प्राथमिक आरोग्य केंद्रांची आहे. लम्पीचा संसर्ग आल्यानंतर जिल्ह्यात किती पशुवैद्यकीय रूग्णालयांची गरज आहे यावर चर्चा झाली का? सोलापूरचेही हाल सांगालयाच नको. गटबाजीच्या राजकारणात सोलापूर बकाल होत चालले आहे.

**पालकमंत्र्यांची स्वतंत्र यंत्रणा हवी...**



पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे महिन्यापूर्वी येवून गेले. लोकांनी त्यांना भेटून निवेदने दिली. ती पीएंच्या हातात दिली गेली. पीएंच्या हाती निवेदने जाणे म्हणजे ‘झाले गेले, गंगेला मिळाले’, अशातला प्रकार असतो. तेव्हा ४ ऑक्टोबरला दिलेल्या निवेदनांवर काय कार्यवाही झाली हे कळायला मार्ग नाही. लोकांची कामे फास्ट होण्यासाठी पालकमंत्र्यांची शिफारस हवी असते. तेव्हा पालकमंत्र्यांची सोलापुरात स्वतंत्र यंत्रणा हवी. सोलापुरात कार्यालय झाल्यास लोकांना मोठा दिलासा मिळेल. पालकमंत्री म्हणून विजयकुमार देशमुख यांनी स्वतंत्रपणे उत्तम व्यवस्था निर्माण केलेली होती. सकाळी दिलेल्या निवेदनावर सायंकाळी शिफारस पत्रे मिळायची.